# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## दूरशिक्षण विभाग

# गृहपाठ

## बी.ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे

## तृतीय वर्ष

## २०१४-१५

प्रती : १०००

डी.टी.पी.-दूरशिक्षण विभाग

## गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी पुढील सूचना वाचाव्यात व त्याप्रमाणे गृहपाठांचे काम करावे.

---

१. बी.ए. (विशारद) सामाजिकशास्त्रे या अभ्यासक्रमातील गृहपाठ लेखन हा महत्त्वाचा आणि अनिवार्य भाग आहे. गृहपाठ लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने संबंधित विषयाचे पुस्तक वाचून मगच गृहपाठ लिहिणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा विषयाचा अभ्यास होतो. स्वयंअध्ययनाची सवय व्हावी व उत्तरपत्रिका लेखनाचा सराव व्हावा हाच गृहपाठ लेखनामागील हेतू आहे.

२. गृहपाठ लिहिताना पुस्तकातील मजकुराची केवळ नक्कल करू नये. विद्यार्थ्याने विषय समजून घेऊन गृहपाठ लिहिला आहे की नाही हे जाणीवपूर्वक पाहिले जाते आणि त्याप्रमाणे गुण दिले जातात. प्रत्येक गृहपाठ १६ गुणांचा आहे.

३. गृहपाठ त्यांच्या अनुक्रमानुसार व सलग लिहावेत. एक गृहपाठ संपल्यावर ठळक रेघ मारून पुढील ओळीवर अथवा नव्या पानावर पुढील गृहपाठ लिहावा. उत्तरात लाल शाईचा वापर करू नये. योग्य समास सोडावा.

४. मोठ्या प्रश्नांचे उत्तर ६० ते ७० ओळीत असावे. गरजेनुसार जास्त चालेल. टीपा लिहा प्रत्येकी २५-३० ओळीत उत्तरे असावे.

५. उत्तरात गरज नसताना १,२,३ ......... असे आकडे घालण्याऐवजी योग्य परिच्छेद पाडावेत.

६. उत्तराला सुरुवात करताना छोटेसे प्रास्ताविक व उत्तराच्या शेवटी समारोप असेल तर ते उत्तर अधिक चांगले मानले जाते.

## पर्यटन भूगोल - (GG - 3)

**प्रश्न १) पर्यटन भूगोलाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** - पर्यटन भूगोलाची व्याख्या, व महत्त्व

मुद्दे - पर्यटन उद्योग महत्त्वाचा, वैशिष्ट्ये पूर्ण, विविधता, मनोरंजकता, गतीशील व स्थिर, अनुत्पादकता, ऐतिहासिकता, भौगोलिकता, सांस्कृतिक व धार्मि क व्याप्ती - पर्यावरणाची माहिती व जिज्ञासा, लोकांचा संपर्क वाढतो, पर्यटनामध्ये आधुनिकता, पर्यटनाची प्रगती, नवनवीन शोध, इतर देशाशी संपर्क, रोजगारनिर्मिती इत्यादी मुद्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

**प्रश्न २) सांस्कृतिक पर्यटनाचे घटक उदाहरणासह स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** - सर्व सांस्कृतिक घटकांसाठी आदरातिथ्य अशी संज्ञा वापरली जाते. पर्यटकांना एखाद्या प्रदेशाबद्दल असलेली उत्सुकता, आपुलकी, आत्मीयता योग्य माहिती देऊन निर्माण करता येते.

मुद्दे - खरेदी, संगीत, नृत्य, शेती, आहार व पेये, उद्योगधंदे, व्यवसाय, चिरस्मारक परंपरा, चालीरीती, संस्कृती इत्यादी मुद्यांचे सविस्तर व उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

**प्रश्न ३) पर्यटनाचे आर्थिक घटकांवर होणारे परिणाम स्पष्ट करा.**

**प्रस्तावना -** पर्यटनाचे उत्पन्न म्हणजे पर्यटकांना वस्तू व सेवा इत्यादी खर्चाचा समावेश होतो, तर पर्यटनाचे उत्पन्न म्हणजे पर्यटकांना वस्तू व सेवा पुरवून मिळवलेले उत्पन्न होय.

**मुद्दे -** आर्थिक विकासाला सहाय्य, परकीय चलन, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, सरकारला मिळणारा महसूल, देवघेवीचा समतोल, स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत, पर्यटन आणि उत्पन्न, पर्यटन आणि इतर उद्योगांचा विकास, पर्यटन व प्रादेशिक विकास, पर्यटन व रोजगार, पर्यटन व गुंतवणूक या मुद्द्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**समारोप -** पर्यटकांना होणारा केवळ खर्च नव्हे तर वरीलप्रमाणे अनेक अप्रत्यक्ष व उत्पन्न यांचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा. (कोणतेही दोन)**

१) **पर्यटनाचे सांस्कृतिक घटकांवर होणारे परिणाम स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** - पर्यटनाच्या विकासाचे प्राचीन अवशेष, निसर्ग सौंदर्य आणि राष्ट्रीय वारसा जतन होण्याची कल्पना वाढीस लागते.

मुद्दे - पर्यटन व नीतिमत्ता, पर्यटन व जुगार, पर्यटन आणि धर्म, पर्यटन व भाषा या मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

२) **पर्यटनामध्ये रेल्वे वाहतुकीचे महत्त्व स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** - विसाव्या शतकाच्या सुरुवातीस समूह पर्यटनासाठी रेल्वे वाहतुकीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होऊ लागला.

मुद्दे - रेल्वे वाहतूक, वेळेची बचत, आरामदायक प्रवास, रेल्वे समुह पर्यटनाचे प्रमुख साधन, आर्थिकदृष्ट्या फायदेशीर या मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

३) **वाहतूक साधनाच्या निवडीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – पर्यटनाच्या मूलभूत घटकांपैकी वाहतूक साधने, वाहतूक खर्च व वाहतूक कालावधी, पर्यटकांची सांपत्तीक स्थिती आणि वाहतूक साधने, प्रवासाचा कालावधी व हंगाम, वाहतुकीची कार्यक्षमता इत्यादी मुद्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

४) **पर्यटन उत्पादनाचे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – उत्पादन उपलब्धता ही बाजारपेठा कार्यान्वित होण्यासाठी आवश्यक गोष्ट आहे.
मुद्दे – आकर्षण : पर्यटक विशिष्ट आकर्षण असलेल्या ठिकाणाची निवड करतो.
सुविधा : सेवा सुविधा स्थळाच्या ठिकाणी पुरक असेल तिथे. उदा. निवास, मनोरंजन, क्रीडा.
सुगमता : वाहतुकीच्या सोयी.
या मुद्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

**प्रश्न ५) टीपा लिहा (कोणत्याही दोन)**

१) **पर्यटन भूगोलाचे महत्त्व**

**प्रस्तावना –** पर्यटन भूगोलाची व्याख्या
मुद्दे – नवनवीन पर्यटन स्थळांची माहिती, स्थल वैशिष्ट्ये व निसर्गसौंदर्य असणारी ठिकाणे. **समारोप**

२) **पर्यटन समस्या**

**प्रस्तावना –** पर्यटन व्यवसाय अधिक विकसित झाल्यामुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.
मुद्दे – सामाजिक व सांस्कृतिक समस्या, आर्थिक समस्या, पर्यावरणीय समस्या इत्यादी मुद्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

३) **पर्यटन व नैसर्गिक वनस्पती**

**प्रस्तावना** – नैसर्गिक वनस्पती हा पर्यटन विकासातील महत्त्वाचा घटक आहे.
मुद्दे – नैसर्गिक वनस्पतीच्या स्वरूपात बदल, पर्यटकामुळे वनस्पतीचे नुकसान, वनस्पतींची तोड, प्रदूषण, झाडांवर विपरित परिणाम, पशुपक्ष्यांना धोका, लोकांचे अतिक्रमण इत्यादी घटकांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

४) **हवाई वाहतूक**

**प्रस्तावना** – दीर्घकाळ अंतरावरील व आंतरखंडीय प्रवासासाठी हवाई वाहतुकीस पर्याय नाही. सर्वात जलद पण महागडा वाहतूक मार्ग, त्यामुळे मालवाहतुकीपेक्षा प्रवासी वाहतूक ही जास्त कार्यक्षम होते.
मुद्दे – दीर्घकाळ अंतरासाठी गतिमान, आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान व पर्यटन याबाबतीत हवाई वाहतूक महत्त्वाची, मौल्यवान वस्तुंसाठी सोयीस्कर, मर्यादीत जागा, कमी वजनाच्या मालासाठी, खर्च जास्त, यांत्रिक व्यवस्था, इंधन जास्त, उच्च राहणीमानातील लोकांसाठी, इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

❁❁❁

# भारतीय समाज (SG - 3)

**प्रश्न १) भारतीय समाजातील विविध धर्मांचे स्वरूप स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – भारतातील धर्मजीवन अनेक पदरी व गुंतागुंतीचे आहे.

भारतीय समाजातील विविध धर्म – वैदिक धर्म, बौद्ध धर्म, जैन धर्म, हिंदू धर्म, शीख धर्म, इस्लाम धर्म, ख्रिश्चन धर्म या धर्मांची तत्त्वे, वैशिष्ट्ये. **समारोप**

**प्रश्न २) आदिवासींच्या समस्या स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – आजच्या आधुनिक युगात मानवाची झालेली वैज्ञानिक प्रगती, विविध सुविधांची झालेली सोय इत्यादी लक्षात घेता भारतातील आदिवासी अजूनही प्रारंभिक अवस्थेतील जीवन जगतात. आदिवासींच्या समस्या गुंतागुंतीच्या या समस्यांना अनेकविध छटा.

समस्या – आर्थिक समस्या, सामाजिक व सांस्कृतिक समस्या, आरोग्यविषयक समस्या, शासनाचे सदोष धोरण. **समारोप**

**प्रश्न ३) भारतातील विविधतेस कारणीभूत घटक स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक** – भारतीय समाजाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे दिसून येणारी विविधता, परंतु या विविधतेबरोबरच एकताही भारतीय समाजात दिसून येते.

**विविधतेस कारणीभूत घटक** – धर्म, भाषा, प्रांत, प्रांतानुसार आचारातील विविधता, जात, आदिवासी, सर्वसामान्य जनता आणि बुद्धिजीवी वर्ग यांच्यातील विभाजन.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

१) **ब्रिटीशपूर्व काळातील ग्रामीण समाजाची आर्थिक वैशिष्ट्ये लिहा.**

ब्रिटीशपूर्व काळात शेती हा प्रमुख व्यवसाय त्यामुळे खेड्यांमध्ये प्रामुख्याने शेतकरी वर्गाची वस्ती

ग्रामीण समाजाची आर्थिक वैशिष्ट्ये – शेतीप्रधान अर्थव्यवस्था, शेती उत्पन्नाचे विभाजन, व्यवसायाचे कौटुंबिक स्वरूप, बलुतेदारी पद्धत, परंपरागत व्यवसाय, उपजीविकाप्रधान स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था, समुदाय संवेदना, साधी राहणी, किमान गरजा, आर्थिक विषमतेचा अभाव, भौगोलिक अलिप्तता.

२) **आर्थिक विकासाचा लोकसंख्यावाढीवर कोणता परिणाम होतो?**

**परिणाम** – १) मृत्यूदर हळूहळू नियंत्रणाखाली पण जन्मदर पूर्वीच्याच पातळीवर त्यामुळे लोकसंख्यावाढ वेगाने २) औद्योगिकीकरणाचे परिणाम ३) डरखीमचे विचार

३) **हिंदू विवाहाचे स्वरूप स्पष्ट करा.**

**स्वरूप** – पवित्र संस्कार, मनुस्मृतीतील विवाहाचे आठ प्रकार, कपाडिया, प्रभू यांचे मत.

४) **अनुसूचित जातींच्या समस्या लिहा.**

**समस्या** – व्यवसाय निवडीचा अभाव, घृणित व्यवसाय करण्यास भाग पाडलेली पारंपरिक जातिव्यवस्था, वेठबिगारी, अत्यंत हलाखीचे आर्थिक जीवन, सामाजिक अन्याय व शोषण, शिक्षणापासून वंचित, सार्वजनिक ठिकाणी (पाणवठा, मंदिरे, उत्सव) प्रवेशास मनाई.

**प्रश्न ५) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **ब्रिटीश कालीन कायदा व न्यायव्यवस्था**

ब्रिटीश काळात जात/वर्गभेद नाही, पंचायतीचे महत्त्व कमी, न्यायदानाचे काम उच्च, जिल्हा, तालुका न्यायालयांमार्फत, कायद्यांचे संहितीकरण, अधिकारांचे विभाजन,

२) **'कुटुंब' या संस्थेचे सामाजिक संस्था म्हणून महत्त्व**

महत्व - मूलभूत स्वरूपाची संस्था, प्राथमिक समूह म्हणून महत्त्व, कुटुंबाद्वारे सामाजिकीकरण, संस्कार केले जातात. वैवाहिक संबंधांवर नियंत्रण, व्यक्तीचे स्थान व भूमिका यांची निश्चिती, समाजाचे सातत्य, सुसंगती, समाजस्वास्थ्य अबाधित राखले जाते.

३) **अनुसूचित जातींची सद्यःस्थिती**

सद्यःस्थिती - जातिभेद पूर्णपणे नाहीसा नाही तर त्याच्या स्वरूपात बदल, अनुसूचित जातीमध्येही अनंत भेद व स्तर, वाद, सवलतींमुळे सवर्ण व अस्पृश्यांमध्ये कटुता ती समाजाच्या एकात्मतेला घातक, उच्चपदस्थ दलितांचे आपल्या समाजाकडे दुर्लक्ष, जातीय संघटना, काही राज्यांमध्ये जातपात व शिवाशिवीच्या कल्पना रूढ, जातिनिरपेक्ष संघटनांची बांधणी करणे, आर्थिक विषमता नष्ट करणे, वैचारिक समतेसाठी लोकजागृती होणे यांसारखे काही मार्ग आवश्यक.

४) **नवे शैक्षणिक धोरण**

शिक्षणाचे उद्दिष्ट, आशय व प्रक्रिया यांचा पुनर्विचार, मूल्यमापन प्रक्रिया व परीक्षा पद्धतीत सुधारणा, शिक्षणाचे व्यवस्थापन, साधनसंपत्ती आणि आढावा.

❁❁❁

# आधुनिक राजकीय विचारप्रणाली (PG - 3)

**गृहपाठ १) राष्ट्रवादाच्या विविध प्रकारांची चर्चा करा.**

**प्रस्तावना –** राष्ट्रवादाचा अर्थ व व्याख्या लिहिणे.
**राष्ट्रवादाचे विविध प्रकार**
१) सनातन राष्ट्रवाद
२) आर्थिक राष्ट्रवाद
३) धार्मिक राष्ट्रवाद
४) आधुनिक राष्ट्रवाद
५) आशिया व आफ्रिका खंडातील नवा राष्ट्रवाद
वरीलप्रमाणे राष्ट्रवादाचे विविध प्रकारातील प्रत्येक प्रकार थोडक्यात लिहिणे.

**गृहपाठ २) जे. एस मिलचे स्वातंत्र्याबाबतचे विचार लिहा.**

**प्रस्तावना –** स्वातंत्र्याची आवश्यकता – स्वातंत्र्याचा अर्थ व प्रकार
स्वातंत्र्यावर आघात करणाऱ्या बाबी. **समारोप.**

**गृहपाठ ३) लोकशाही समाजवादाची तत्त्वे सांगून लोकशाही समाजवादाचे मूल्यमापन करा.**

**प्रस्तावना** – लोकशाही समाजवादाचे स्वरूप थोडक्यात लिहावे.
लोकशाही समाजवादाची तत्त्वे
१) स्वार्थी व्यक्तिवादाला विरोध २) पिळवणूक करणाऱ्या भांडवलशाहीला विरोध ३) खासगी उत्पादन क्षेत्रावर नियंत्रण ४) मूलभूत हक्कांची जपवणूक ५) समानतेचे तत्त्व ६) लोकशाहीचा पाया व्यापक
वरील मुद्यांच्या आधारे लोकशाही समाजवादाची तत्त्वे थोडक्यात लिहिणे. लोकशाही समाजवादाचे मूल्यमापन लोकशाही समाजवादाचे मूल्यमापन गुण आणि आक्षेप यांच्या आधारे लिहावे.
**समारोप** – लोकशाही समाजवादाचे यशापयश या मुद्याच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

**अ) जॉन लॉक यांचे राजकीय विचार स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – जॉन लॉक यांचे तत्त्वज्ञान युरोपच्या उदारमतवादाच्या इतिहासात पायाभूत ठरले आहे. लॉक यांना 'युरोपातील उदरमतवादाचा जनक' म्हणून संबोधले जाते.
जॉन लॉक यांचे राजकीय विचार – १) निसर्गावस्था २) सामाजिक करार ३) राज्यसंस्थेचा उद्देश ४) सत्ताविभाजन ५) कायदेमंडळाचे महत्त्व ६) अनिर्बंध सत्तेला विरोध ७) प्रतिकाराचा हक्क ८) मालमत्तेचा हक्क – वरील मुद्यांच्या आधारे लॉकचे राजकीय विचार थोडक्यात स्पष्ट करणे.
**समारोप** – लॉकच्या राजकीय विचारांमध्ये स्वातंत्र्य, बहुमताची निर्णायकता, सनदशीलता, कायद्याचे अधिराज्य, शांततामय परिवर्तन, संपत्तीचा अधिकार इत्यादी संकल्पनांचे मूळ सापडते.

**आ) बेन्थॅमची उपयोगितावादाची संकल्पना स्पष्ट करून जे. एस्. मिलने त्यात कोणती भर घातली ते स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – १९ व्या शतकाच्या प्रारंभी उपयुक्ततावादाचे व्यवहारी राजकीय तत्त्वज्ञान उदयाला आले.
बेन्थॅमची उपयोगितावादाची संकल्पना –

जेरेमी बेन्थॅम याने सर्वप्रथम उपयोगितावादाचे तत्त्वज्ञान मांडले.
उपयोगिताचा अर्थ स्पष्ट करून लिहिणे.
बेन्थॅमने सुखाचा संख्यात्मक विचार केला. त्याच्या मते सुखाचे मोजमाप करता येते.
जे. एस्. मिलने बेन्थॅमच्या उपयोगितावादात घातलेली भर –
अ) गुणात्मक फरक आ) मोजमाप कठीण इ) नैतिकतेवर भर ई) सामाजिक आशय
वरील मुद्यांच्या आधारे उत्तर स्पष्ट करून लिहिणे.
**समारोप** – बेन्थॅमच्या उपयुक्ततावादाच्या एकांगी सिद्धान्तात भर घालून मिलने तो अधिक पूर्णत्वास नेला.

**इ) समाजवादाची व्याख्या व वैशिष्ट्ये सांगून फेबियन समाजवाद स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – दारिद्र्य व शोषण नष्ट करून न्याय्य पायावर समाजाची पुनर्रचना व मानवाचे जीवन सुखी आणि सुरक्षित बनविणे या विचारावर समाजवादाची इमारत उभी आहे. अन्यायाची चीड, मानवता, श्रमाला प्रतिष्ठा इ. गुणांमुळे समाजवाद नैतिकदृष्ट्या योग्य ठरला आहे.
समाजवादाची व्याख्या – लॉवेल, ह्यूगन यांच्या व्याख्या लिहिणे.
**समाजवादाची वैशिष्ट्ये** – १) मर्यादित स्पर्धा २) वैयक्तिक नफ्यावर बंधने ३) गरजेनुसार वस्तूंचे उत्पादन ४) किमतींचे नियंत्रण ५) वस्तू व सेवांचे योग्य प्रकारे वाटप ६) उत्पादन साधने शासनाच्या मालकीची ७) समाजहित साधले गेले पाहिजे.
फेबियन समाजवाद – फेबियन समाजवादाचे आधार व वैशिष्ट्ये लिहिणे.
**समारोप** – समाजवादाचे भवितव्य थोडक्यात सारांश रूपाने लिहिणे.

**ई) मार्क्सवादाचे मूल्यमापन करा.**

**प्रस्तावना** – कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवाद, वर्ग संघर्षाचा सिद्धान्त, अतिरिक्त मूल्यांचा सिद्धान्त या संकल्पनांविषयी थोडक्यात लिहिणे.
**मार्क्सवादाचे मूल्यमापन** – १) सर्वच गोष्टींच्या मुळाशी भौतिकवाद असतो हे मार्क्सचे मत बरोबर वाटत नाही. २) आर्थिक घटकांवर जास्त भर ३) युरोपातच मार्क्सच्या विचारांचा पराभव ४) दोनच वर्गांचा विचार, इतर वर्गांकडे दुर्लक्ष केले आहे. ५) अतिरिक्त मूल्याचा सिद्धान्त चुकीचा वाटतो. ६) वर्गविहीन समाज अस्तित्वात येणे शक्य नाही.
वरील मुद्यांच्या आधारे मार्क्सवादाचे मूल्यमापन लिहावे.
**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) लेनिनवाद**

**प्रस्तावना** – मार्क्सच्या विचारांचा लेनिनवर असलेला प्रभाव याबाबत लिहिणे, तसेच लेनिनने रशियातील परिस्थितीनुसार मार्क्सवादात कोणती भर घातली याचे विवेचन थोडक्यात लिहिणे.
लेनिनवाद –
१) भांडवलशाही व साम्राज्यावादासंबंधीचे विचार २) क्रांतीचा सिद्धान्त ३) शेतकऱ्यांची भूमिका ४) युद्ध ही क्रांतीची दाई ५) क्रांतीनंतरच्या सुधारणा इत्यादी मुद्यांच्या आधारे लेनिनवाद थोडक्यात लिहिणे.
**समारोप** – लेनिनवादाचे मूल्यमापन सारांश रूपाने थोडक्यात लिहिणे.

**आ) माओवादाची वैशिष्ट्ये**

**प्रस्तावना** – माओ-त्से-तुंग याने मार्क्सवाद व लेनिनवाद यात भर घातली आहे. मात्र माओने त्याच्या विचारांना आशियाई स्वरूप दिले. मार्क्सची तत्त्वे व्यवहारात आणून ती यशस्वी करणारा माओ हा पहिलाच आशियाई नेता होय.

माओवादाची वैशिष्ट्ये

१) संयुक्त आघाडीचा सिद्धान्त २) युद्धाची तत्त्वे ३) सत्तेचा सिद्धान्त ४) लोकशाहीवादी हुकूमशाही ५) ग्रामीण व शहरी विभागांचा सिद्धान्त ६) जुन्यांचा विध्वंस ७) माओचा विसंगतीचा सिद्धान्त ८) इच्छाशक्तीचे महत्त्व ९) कम्युन्स १०) हनुमान उडी ११) माओची सांस्कृतिक क्रांती

वरील मुद्यांच्या आधारे माओवादाची वैशिष्ट्ये थोडक्यात लिहिणे.

**समारोप** - माओवादाचे मूल्यमापन सारांश रूपाने थोडक्यात लिहिणे.

इ) **क्युबामधील समाजवाद**

**प्रस्तावना -** क्युबामध्ये जानेवारी १९५९ साली फिडेल कॅस्ट्रोच्या नेतृत्वाखाली साम्यवादी क्रांती घडून आली. क्युबामधील समाजवाद - समता व न्याय या विचाराने भारावलेल्या फिडेल कॅस्ट्रोच्या नेतृत्वाखाली क्रांती केल्यानंतर त्यांनी येथे समाजवादी अर्थव्यवस्था आणली. अमेरिकेने कडक आर्थिक निर्बंध लादून क्युबाची कोंडी केली, यावेळी क्युबाने रशियाच्या मदतीने समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण केली. परकीय सेवा, उद्योगधंदे यांचे राष्ट्रीयीकरण केले. शेतीचे आधुनिकीकरण केले. न्याय, समता, व समृद्धीकडे क्युबाने यशस्वीपणे वाटचाल केली.

**समारोप -** वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

ई) **नाझीवाद (नाझीझम)**

**प्रस्तावना** - नाझीझमची पार्श्वभूमी थोडक्यात लिहिणे.

**नाझीवाद -** १) समाजवाद व साम्यवादाला विरोध २) वंशवाद ३) आत्यंतिक राष्ट्रवाद ४) हिंसेचे तत्त्वज्ञान इत्यादी नाझीवादाची वैशिष्ट्ये सविस्तरपणे लिहिणे.

**समारोप** - हिटलरच्या काळात जर्मनीमध्ये निर्माण झालेल्या नाझीझमने जर्मनीचा कायापालट तर घडवून आणलाच; परंतु त्यामुळे दुसरे महायुद्ध घडून आले आणि त्याचे अत्यंत दूरगामी परिणाम झाले.

❀❀❀

# कृषी अर्थशास्त्र (EG - 3)

**प्रश्न १) भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे स्थान स्पष्ट करा.**

भारत एक विकसनशील, कृषीप्रधान देश, शेती हा मुलभूत व्यवसाय, अर्थव्यवस्थेत अद्यापही महत्त्वाचे स्थान, महत्त्व स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक, अन्नधान्याचा पुरवठा, उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा, भांडवल निर्मितीस मदत, रोजगाराचे प्रमुख साधन, राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा, आंतरराष्ट्रीय व्यापारातील महत्त्व, औद्योगिक विकासाला मदत इ.

**प्रश्न २) शेती व्यवसायातील जलसिंचनाचे महत्त्व स्पष्ट करा.**

शेतीव्यवसाय - पाण्यावर अवलंबून असलेला व्यवसाय, पाण्याशिवाय शेती शक्य नसते. भारतातील शेती पावसावरील जुगार समजली जाते. शेतीसाठी जलसिंचनाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. महत्त्व स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक, अनियमीत पाऊस, विविध पिकांची गरज, उत्पादकतेत वाढ, रोजगारात वाढ, इतर कार्यासाठी जमिनीचा वापर, एका पेक्षा जास्त पिके घेणे शक्य होते इ.

**प्रश्न ३) विपणनातील कार्ये स्पष्ट करा.**

शेतीमालाचा उत्पादक व ग्राहक यांच्यात मोठे अंतर. म्हणून अनेक गोष्टींचा समावेश असलेली विपणनाची आवश्यकता निर्माण होते. शेतीमालाच्या बाबतीत विपणनाचे कार्य मूळ वस्तूच्या उत्पादनाचा काळ व स्थान यापासून सुरू होऊन अंतिम ग्राहकाच्या खरेदीजवळ थांबतात. प्रा. एफर्सन यांच्या मते विपणन कार्यात पुढील घटकांचा समावेश असतो.

मालाचे एकत्रीकरण, प्रतवारी, प्रक्रिया, दळणवळण, संग्रहण, वित्तपुरवठा, विक्री, आवेष्टन, जोखीम स्विकारणे, वितरण इ. मुद्दे विपणनातील कार्ये म्हणून स्पष्ट करावीत.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (फक्त दोन)**

**अ) कोणत्या कारणासाठी शेतीला कर्जपुरवठ्याची गरज असते?**

शेतीसाठी अल्प-मध्यम-दीर्घ मुदतीच्या कर्जाची सतत गरज असते. मुख्य कारणे - उत्पादन व उपभोगासाठी कर्ज, शेती विकासासाठी, अनुत्पादक कारणांसाठी, आकस्मिक कारणांसाठी. इ. या कारणांचे स्पष्टीकरण देऊन उदाहरणे द्यावीत.

**ब) आदर्श बाजार व्यवस्थेचे गुण/वैशिष्ट्ये सांगा.**

शेतीमाल विक्रीचे महत्त्व लक्षात घेता आदर्श बाजारव्यवस्थेमध्ये कोणती वैशिष्ट्ये असावीत हे ठरविता येते. वैशिष्ट्ये - बाजारविषयक माहिती, तात्पुरता कर्ज पुरवठा, साठवणुकीच्या सुविधा, दळणवळणाच्या सोई, कार्यक्षम विक्री संस्था इ. मुद्यांचे स्पष्टीकरण करावे.

**क) जमिनीच्या विभाजनाची व अपखंडनाची कारणे सांगा.**

विभाजन व अपखंडनाचा अर्थ थोडक्यात स्पष्ट करावा, कारणे स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे विश्लेषण करावे. कारणे - लोकसंख्या वाढ, बेकारी, वारसा हक्कांचे कायदे, कौटुंबिक विघटन, ग्रामोद्योगांचा ऱ्हास, कर्जबाजारीपणा, सामाजिक दृष्टीकोन इ.

**ड) शेतमजुरांची संख्या वाढीची कारणे सांगा.**

शेतमजूर व्याख्या व स्पष्टीकरण, शेतमजुरांची संख्या वाढण्याची कारणे - लोकसंख्या वाढ, गतीक्षमतेचा अभाव, पर्यायी रोजगाराचा अभाव, कर्जबाजारीपणा, औद्योगिकीकरणाचा अभाव, दारिद्र्य इ. कारणे स्पष्ट करावीत.

प्रश्न ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) **पीककर्ज योजना –**
पीक कर्ज योजना संकल्पनेचे थोडक्यात स्पष्टीकरण, पीक कर्जाचे उद्देश, या योजनेची वैशिष्ट्ये, योजनेचे थोडक्यात मूल्यमापन, या प्रमुख मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

ब) **शेतीमाल विक्रीव्यवस्थेतील दोष –**
शेतमाल विक्रीच्या पद्धतीत अनेक दोष आढळतात. दोष – स्थानिक पातळीवर मालाची विक्री, दलालांचे अस्तित्व, विविध प्रकारचे कर, प्रतवारीचा अभाव, साठवणूक सोईंचा अभाव, दळणवळणाचा अभाव, वजन – मापातील दोष, असंघटित उत्पादक, इ. मुद्यांचे स्पष्टीकरण करावे.

क) **शेतीच्या यांत्रिकीकरणाचे फायदे –**
शेतीच्या यांत्रिकीकरणाची संकल्पना – स्पष्टीकरण, अनेक फायदे – कामाची गती वाढते, उत्पादन खर्चात घट, मोठ्या प्रमाणावर शेती करता येते, पशुंवरील खर्च कमी होतो, रोजगार संधी वाढते, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारते इ. मुद्यांचे स्पष्टीकरण करावे.

ड) **बहुपीक पद्धती –**
संकल्पनेचे स्पष्टीकरण, बहुपीक पद्धतीसाठी आवश्यक असणाऱ्या घटकांचे स्पष्टीकरण – पाण्याची सोय, पीकांचा प्रकार, सुधारीत मशागत, बाजारपेठ, पिकांची निवड इ.

❁❁❁

# <u>मध्ययुगीन भारत</u> (HG - 3)

**प्रश्न १) शेरशहा सूरीच्या प्रशासनावर टिपण लिहा.**
**प्रस्तावना** – शेरशहा सुरीची माहिती (थोडक्यात)
**मुख्य मुद्दे** – केंद्रीय व्यवस्था, प्रांतिय व्यवस्था, महसूल व्यवस्था
**समारोप** – मूल्यमापन

**प्रश्न २) विजयनगर साम्राज्याची माहिती लिहून मूल्यमापन करा.**
**प्रस्तावना** – विजयनगर साम्राज्याच्या उदयाची कारणे
**मुख्य मुद्दे** – संगम, शाल्व, तुल्व वंश, कृष्णदेवरायाची माहिती, तालिकोटची लढाई
**समारोप** – ऱ्हासाची कारणे

**प्रश्न ३) मुघलकालीन आर्थिक जीवन व नागरीकरण यांची माहिती द्या.**
**प्रस्तावना –** मुघल साम्राज्याचा अल्प परिचय,
**मुघलकालीन आर्थिक जीवन –** शेती, व्यापार, उक्षेग,
**नागरीकरण –** व्यापारी बंदरे, हस्तोद्योग केंद्रे, राजधान्यांची गावे, धार्मिक स्थळे.
**समारोप –** मोगलकालीन आर्थिक भरभराटीनेच पाश्चात्त्यांना आकर्षित केले. याच काळात भारतात पाश्चात्त्यांचे आगमन झाले. व्यापारी म्हणून आलेल्या या पाश्चात्त्यांनी पुढे भारतात सत्ता काबीज केली.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (फक्त दोन)**

१) **अल्लाउद्दीन खिलजीच्या अंतर्गत सुधारणांचा आढावा घ्या.**
**प्रस्तावना** – अल्लाउद्दीन खिलजीचे राज्यग्रहण व अडचणी (थोडक्यात)
**मुख्य मुद्दे** – महसूल सुधारणा – करआकारणी, जमिनीची मोजणी, सैन्य सुधारणा – खंड सैन्य, प्रत्यक्ष पगार, सैनिकांच्या श्रेणी, सैनिकांची हजेरी, किल्ले, वस्तूंचे भावनियंत्रण – सराय – ऐ- आदल, शहाना – ए – मंडी, व्यापारात काटेकोरपणा व कडक कायदे व शिक्षा
**समारोप** – मूल्यमापन

२) **अकबराच्या कारकीर्दीचे थोडक्यात मूल्यमापन करा.**
**प्रस्तावना** – अकबराच्या कारकीर्दीतील महत्त्वाच्या घटनांचा आढावा. उदा. – पानिपतची दुसरी लढाई साम्राज्यविस्तार (प्रत्येकी एका वाक्यात)
**मुख्य मुद्दे** – अकबराचे राजपत धोरण, धार्मिक धोरण (इबादतखान, दिन – ए – इलादी) यांची थोडक्यात माहिती अकबराच्या सुधारणा.
**समारोप** – अकबराचे भारतीय इतिहासातील स्थान व महत्त्व.

३) **शहाजहानच्या कारकीर्दीतील 'वारसा संघर्षाचा' आढावा घ्या.**
**प्रस्तावना** – दारा सुकोह, शाह शुजा, औरंगजेब व मुदादबक्ष यांची माहिती
**मुख्य मुद्दे** – चौघांच्या शहाजहानच्या आजारपणाच्या काळातील जहांगिरी व नेमणूका, त्यातून उद्भवलेले अविश्वासाचे वातावरण, मुराद, औरंगजेब संयुक्त सैन्याकडून दाराच्या सैन्याचा पराभव, औरंगजेबाची कूटनीति, स्वतःला राज्याभिषेक व शहाजहानची कैद.
**समारोप** – औरंगजेबाच्या यशाचे मूल्यमापन

४) **अकबराच्या मनसबदारी पद्धतीची माहिती लिहा.**
**प्रस्तावना** – लष्करी प्रशासन
**मुख्य मुद्दे** – मनसब म्हणजे काय? ३३ श्रेणी, मनसबदारांच्या नेमणूका, नियुक्त्या, बडतर्फी, त्यांचे नियंत्रण
**समारोप** – मूल्यमापन

**प्रश्न ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **बल्बनचा दैवी राजसत्तेच्या तत्त्वाचा सिद्धान्त**
**प्रस्तावना** – बल्बनच्या राजकारभारातील प्रारंभिक अडचणी
**मुख्य मुद्दे** – राजेपदाचा सिद्धान्त व राजपदाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी केलेल्या उपाययोजना

२) **मुहम्मद तुघलकाचा राजधानी बदलण्याचा व नवीन चलनाचा प्रयोग**
**प्रस्तावना** – मुहम्मद तुघलकाची प्रशासकीय धोरणे
**मुख्य मुद्दे** – राजधानी बदलाचा प्रयोग दिल्लीहून देवगिरीला राजधानी हलविण्याची कारणे, परिणाम, नवीन चलनाचा प्रयोग, त्याचे दुष्परिणाम
**समारोप** – मूल्यमापन

३) **नूरजहान**
**प्रस्तावना** – नूरजहानचे पूर्वचरित्र
**मुख्य मुद्दे** – नूरजहानचा जुटा, राजकारणातील प्रभाव, निवृत्ती
**समारोप** – नूरजहानचे स्थान व मूल्यमापन

४) **भारतातील ब्रिटिशांच्या विजयाची कारणे. (कोणतीही चार)**
**प्रस्तावना** – ब्रिटिशांनी पराभूत केलेल्या सत्तांची नावे
**मुख्य मुद्दे** – कारणे ब्रिटीशांची एकी व प्रशासकीय धोरणीपणा, ब्रिटीशांची 'फोडा व झोडा' नीती, अद्ययावत शस्त्रास्त्रे व तंत्रज्ञान, राजनैतिक डावपेच, राज्यविस्ताराची पद्धती, लष्करी डावपेच, युद्धतंत्र, लष्करी संघटना, युद्धाची पद्धती यांतील वरचढपणा, आरमार इ.
**समारोप** – ब्रिटीश राजवटीचा पाया व भारताचा आधुनिक जगात प्रवेश

❁❁❁

# मराठी (MG – 3) अभ्यासक्रम

१) कमला – ले. विजय तेंडुलकर
२) विद्रोही कविता – संपा. केशव मेश्राम
३) जरा जाऊन येतो – ले. दि. बा मोकाशी

**विद्रोही कविता – संपा दि. केशव मेश्राम.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नाही लढल्याविण मुक्ती | ४२. | मला जगायचंय |
| ४. | आता | ४८. | जंगलाच्या नव्या आलेखाबद्दल |
| ७. | पाथरवट | ५०. | शिकार होऊ नये म्हणून |
| १०. | ह्या मोसमात | ५४. | संभावित सूर्यासारखे |
| ११. | एका नव्या संघर्षात | ५६. | बरे झाले नसते |
| १४. | एक दिवस मी परमेश्वराला | ६०. | सखी |
| १६. | जपून ठेवले आहे | ६२. | ठेवा |
| १९. | येथला प्रत्येक हंगाम | ६४. | निघाले हे चक्र |
| २५. | तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा! | ६७. | अनामिकास |
| २९. | लोकशाहीचा फुलोरा | ६८. | रस्ते |
| ३१. | माणूस | ६९. | उन्हातलं झाड |
| ३३. | मी निराश नाही रे! | ७०. | सबक |
| ३५. | उधाणलोय | ७३. | मी स्वीकारतो |
| ३९. | वैरी | ७४. | मु. पो. केसलागुडा |
| ४१. | चित्रे | | |

**जरा जाऊन येतो – दि. बा. मोकाशी**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | रोमच्या सुताराची गोष्ट | १०. | अघोर |
| ३. | काय रानटी लोक आहेत! | १४. | आम्हाला काय कमी |
| ५. | वणवा | १५. | पुण्याची मुलगी |
| ६. | आता आमोद सुनासि आले | १८. | जरा जाऊन येतो |
| ७. | लेणी | १९. | अनुनय |

# मराठी (MG -3)

## गृहपाठ १ ला

**प्रश्न – सरिता आणि जयसिंग यांच्यात 'कमला' च्या निमित्ताने अंतर निर्माण होते. या विधानाची चर्चा करा?**

**प्रस्तावना –** तेंडुलकरांचा परिचय – लेखन वैशिष्ठ्ये – सामाजिक ज्वलंत प्रश्न – सामाजिक रूढींच्या विरोधातील प्रश्न.

जयसिंग हा दिल्लीतील इंग्रजी वृत्तपत्राचा पत्रकार – त्यामुळे तो व पत्नी दोघेही दिल्लीला राहतात. सरिता पतिधर्माचे आचरण करणारी – जयसिंग घरात नसताना सुद्धा त्याची सर्व कामे सुरळीतपणे पार पाडणारी – त्याची मर्जी सांभाळण्याचा प्रयत्न करणारी – जेव्हा जयसिंग कमलाला बाजारातून विकत आणतो ते सरिताला पटत नाही – कमला व सरिता या दोघींमधे जेव्हा संवाद होतो तेव्हा कमला सरिताला विचारते 'तुम्हे कित्ते में खरीदा?' – त्यावेळी सरिताच्या भावविश्वात खळबळ माजते. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होते – जयसिंग आपल्याला सुद्धा गुलामासारखा वागवतो या विचारांमुळे त्या दोघांच्यात अंतर निर्माण होते. **समारोप.**

## गृहपाठ २ रा

**प्रश्न – मोकाशींच्या कथा त्यांच्या चिंतनशीलतेचा प्रत्यय देतात – या विधानाची चर्चा करा?**

**प्रस्तावना –** मोकाशी यांचा थोडक्यात परिचय – त्यांचे कथालेखन सहज, सुलभ, मध्यमवर्गीय अनुभवाशी निगडीत – कथांमधील चिंतनशील वृत्तीवर त्यांच्या लेखन शैलीत भर आहे – 'जरा जाऊन येतो' या कथेतील गणेश ओक – त्यातील त्याचे जीवनविषयक चिंतन – तसेच 'आमोद सुनासि आले' या कथेतून 'रामजी' या पत्राद्वारे केलेले जीवन विषयक चिंतन – नेमाणेच्या अडलेल्या गायीची सोडवणूक करताना रामजीला अमृतानुभवातील पुर्नजन्माच्या ओवीचा आलेला प्रत्यय – त्यामुळे रामजीचे नैराश्य दूर होऊन मिळालेले समाधान – त्यातूनच डोकावणारा चिंतनशीलतेचा विचार – **समारोप.**

## गृहपाठ ३ रा

**प्रश्न – मोकाशींच्या कथेची वाङ्मयीन वैशिष्ठ्ये 'जरा जाऊन येतो' या कथा संग्रहाच्या आधारे स्पष्ट करा?**

**प्रस्तावना** – लेखक परिचय – कथासंग्रहाची वैशिष्ठ्ये – कथालेखन सहज, सुलभ – मध्यमवर्गीयांशी निगडीत – तृतीय पुरुषी निवेदन पद्धती – कौटुंबिक अनुभवांवर भर – मोकाशींच्या कथा या कौटुंबिक व सामाजिक अनुभवावर भर देणाऱ्या वेगवेगळ्या वयातील स्त्री – पुरूषांचे अनुभव – लेखन शैलीत व भाषेत ओघवतेपणा – सहजता – अर्थपूर्ण शब्दरचना – संवादात्मक व वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग – कथेतील विचारांची सहज मांडणी – साधेपणाने शेवट – **समारोप.**

## गृहपाठ ४ था

**प्रश्न – 'मी निराश नाही रे' या अर्जुन डांगळे यांच्या कवितेतून कोणता आशावाद प्रकटतो?**

**प्रस्तावना** – कविचा परिचय – दलित पँथर संघटनेचे संस्थापक – कथा कवितांचे वैचारिक लेखन – सामाजिक चळवळीत सक्रीय – त्यांच्या कवितेत समाजजीवनाच्या कुरूपतेचे विचित्र चित्रण – प्रभावीपणे पण तितक्याच स्वाभाविकपणे – मानवी मनाची सोशिकता व समंजसपणा आढळतो – झुंजार व आशावादी प्रतिमा – काव्याचे स्वरूप.

भारतीय समाजव्यवस्थेत बहुजन समाजाचे रितेपण आणि अप्रस्तुताला समस्या मानण्याचा बौद्धिक कोतेपणा – यांचे वास्तवदर्शन – उदास असूनही प्रत्यक्षात त्यांच्या अंतकरणातील आशावद कळंजून गेला नाही – लोकशाही समाजरचना ही मृगजळाप्रमाणे फसवी ठरली – एक उजळ शिल्पित पाहत आहेत – प्रत्यक्ष झुंज देणाऱ्यांना जपण्यातच भविष्यकाळ प्रकाशमय शिल्पकृती येणार – हा आशवाद – त्यामुळे कवि उल्हासित – **समारोप.**

### गृहपाठ ५ वा

**प्रश्न – विद्रोही कविता या काव्यसंग्रहातील 'नाही लढण्याविण मुक्ती' व 'माणूस' या कवितांचे रसग्रहण करा?**

**प्रस्तावना** – 'नाही लढण्याविण मुक्ती' ही कविता 'किसन फागुजी बनसोड' यांची कवितेची वैशिष्ठ्ये – बहुजन समाजाच्या वास्तव – जीवनाची परवड – काव्यात प्रथमच व्यक्त – वेदनेला शब्दरूप धारण – कविता अलंकार सृष्टीत न रमणारी – त्यामुळेच अंतस्थ उफाळणाऱ्या लाव्हाची गाज – अस्पृश्यतेच्या अन्यायाविरुद्ध प्रखर लढा – दलित समाजात चैतन्य व अस्मिता निर्माण करण्याचे काम – महार ही जमात लढाऊ – हा ऐतिहासिक वारसा सांगून आपल्या जातीला लढणे हाच मुक्तीमंत्र – हा कविसंदेश – मुक्तीसाठी स्वतःच्या आचरणात बदल – मोक्ष वेगळा व धार्मिक, आर्थिक व सामाजिक दास्यातून सोडवणूक म्हणजेच मुक्ती.

'माणूस' ही कविता त्र्यंबक सपकाळे यांची – शिक्षण मॅट्रीक पर्यंत सवर्णांच्या व गावकऱ्यांच्या जाचामुळे बालवयातच बहिष्काराचा धडा – आंतरिक उत्स्फोटाचा प्रचंड नाद व त्याचे पडसाद – आक्रमक पण उग्र काव्यात्मक असे कवितेचे स्वरूप – लोकभाषेचा ठसका – भावलयीमुळे संपन्न – उद्धाराची वाट पाहणाऱ्या बांधवांना उद्देशून – आत्मतेज जागवा व आपणच आपले भाग्यविधाते व्हा. हा संदेश – **समारोप.**

❁❁❁

## English G - III Syllabus

**TEXT:-**

**1) Wings of Fire (A.P.J. Abdul Kalam)**
**2) The Magic Drum & Other Favourite Stories (Sudha Murty)**
**3) All Three Grammer Books (TMV)**

**PROSE -** Textual and Non textual

* Textual Comprehension
  a) Reference to context
  b) Answer in brief
  c) Short Notes
* Non-textual Comprehension

**GRAMMAR**

1) Accuracy of expression
   i. Use of Passive Voice
   ii. Use of Indirect Narration
2) Analysis of Simple, Complex and Compound Sentence
3) Revision of All Tenses
4) Use of not only but also, although, As well as, so - that, Question tag, remove too
5) Finding the word with the required shade of meaning with the help of treasures.

**TRANSLATION**

English into Marathi/Hindi

**WRITING**

1) Letter writing - Complaint/Application
2) Summary writing
3) Paragraph writing
4) Conversation writing (given topics)
5) Expansion of ideas

# Subject: English (Eng III)

**Text – 1) Wings of Fire – APJ Abdul Kalam**

**2) Magic Drum and other favorite stories – Sudha Murty**

**Note : All Questions are Compulsory**

---

**Home Assignment – I**

**Q.1) Explain the following sentences giving reference to their context in about 10 – 12 lines. (Any two)** **(5)**

1) "Accept your destiny and go ahead with your life. Perhaps you are not destined to become a pilot. What are you destined to become is not revealed as yet, but it is predetermined. Forget this failure. Think of it as a step that will lead you to your predestined Path."
2) It stops managers from listening to their subordinates are people down the line.
3) "That makes my task so much easier…. You see, I work in the king's court."
4) The central idea of "A Fair Deal."

**Q.2) Answer in brief (any two)** **(5)**

1) What kind of man was Veeravara was?
2) Who, according to Kalam, can be a successful team leader?
3) Describe the character of King Vidyadhar – The seeds of Truth.
4) What ideas did Kalam get, observing curiously the painting of Tipu Sultan?

**Q.3) Write short notes. (any two)** **(4)**

1) Kalam's brith place
2) Compare, write three sentences each about Shiriyala, Gunkara.
3) Sarabhai as an innovator
4) The miserly old couple

**Q.4) Do as directed (any two)** **(2)**

1) She did not love him. She didn't want to marry. (Use neither/nor)
2) They were 'too' late to catch the train. (Remove too)
3) The <u>ugly</u> woman had two _______ daughters (Write the opposite of underlined adjective )

---

## Home Assignment – II

**Q.1) Explain the following sentences giving reference to their context in about 10 – 12 lines. (Any two)** **(5)**

1) “Bread baked without love is a bitter bread, that feeds but half a man’s hunger”.
2) “Why do you not prostrate yourself?”
3) “ I think it is love, even through it is a feeling, not a food”.
4) “I agree with them, but there is one thing that is tastier than all this”.

**Q.2) Answer in brief (any two)** **(5)**

1) Why was Nandini Project abandoned?
2) Give the details of programme visualized by Prof. Vikram Sarabhai.
3) What questions were asked to Suprabha?
4) What is the main idea of “Dead mans’ painting”.

**Q.3) Write short notes. (any two)** **(4)**

1) The Nandi Project
2) Kalams Positive approach towards life.
3) Miserliness described in the stories by Sudha Murty.
4) Sudha Murty as an excellent story letter.

**Q.4) Do as directed (any two)** **(2)**

1) Australia is larger than any other island in the world. (Change the degree)
2) Diamonds are brighter and expensive. (Use not only but also)
3) They were not <u>certain</u> about his visit. I know he would______ come.(Fill in the blank with adverb formed by the underlined word)

## Home Assignment – III

**Q.1) Read the following passage carefully and answers the questions.** **(5)**

Years ago people ate ice-cream only in summer. Now it is eaten all the year round. It originated in Orient, centuries before English School boys first, tasted it.

Marco Polo saw people eating it there are brought back the idea to Italy. From Italy the idea was carried to France. It became Very popular in France with the rich and an effort was even made to keep the recipes a secret from the

common people. But, of course, they soon learned about this delicious new food and ice-cream became popular with everyone soon it spread all it over the world.

The first factory to manufacture ice-cream was started in Baltimore, Maryland in 1851. However the real development of ice-cream and the ice-cream business didn't take place until after 1900 with new developments in refrigeration.

The basis of all ice-cream is cream, milk or solids, sugar, and sometimes eggs. Vanilla, chocolate, berries, fruit, maredients and nuts are added as flavours. This is a usual proportion of ingredients in ice-cream : about 50 to 85 percent cream and milk products, 15 percent sugar, half to four and a half percent flavouring, and three tenths of one percent stabilizer.

**Questions :**

1) Where did ice-cream originate? (1)
2) What are the ingredients of ice-cream? (2)
3) When and where was the first ice-cream factory started? (2)
4) Fill in the blanks with suitable words from the passage. (3)
   a) Children have holidays during ____________ season.
   b) Shahrukh Khan is one of the most _____ actor in India.
   c) Paithani sarees are ________ in Paithan in Maharashtra.
5) When do you mostly eat ice-cream? Which flavor of ice-cream do you like? (2)

**Q.2) Clause analysis (Write principle and subordinate clauses separately) (any two)** **(4)**

1) The pigeons thanked the mouse who had set them free.
2) The poet sat on the beach and watched the sunset.
3) We tried several models and selected this bicycle.

**Q.3) Do as directed. (any two)** **(2)**

1) The parks is not clean. (correct the sentence)
2) Rana Pratab was a handsome and a brave king. (use 'not only but also')
3) You can buy a shirt, you can buy a trouser. (Use 'either/or')

## <u>Home Assignment – IV</u>

**Q.1) Change the voice (Any four)** **(4)**

1) Will you cook the food?

2) Reeta is performing a dance.

3) Honey bee collects nectar from the flowers.

4) The photo was taken by him.

5) Sheela was knitting a sweater.

**Q.2) a) Change the following sentences into indirect speech (any two) (2)**

1) Pradeep said to his father, “Daddy, I have scored 90% marks in the final examination”.

2) The principal said to the peon, “Keep all the files in the shelf.”

3) “Dad”! He shouted “Where are you?”

**b) Change the following sentences into direct speech (any two) (2)**

1) Pappu told Shobha that he loved cricket.

2) Ravi told his friend that he had finished his homework.

3) The teacher requested the peon to bring the register.

**Q.3) Do as directed (any four) (4)**

1) She dances elegantly. (transform into simple future tense)

2) He worked hard to get this job (Transform into past perfect tense)

3) Lata is a melodious singer and a great dancer. (Use ‘not only but also)

4) He hasn’t got_______ money (use any/many)

5) They pray to God every right. (Transform into simple past tense)

**Q.4) Translate the following passage into Marathi or Hindi. (2)**

Prof. Sarabhai was always been on trying novel ideas and he liked to rope in young people to do this. He had the wisdom and judgment to realize not only if something was well done, but also when it was time to stop. In my opinion, he was an innovator.

## Home Assignment – V

**Q.1) Letter writing (Any one) (4)**

a) Write an application letter for the post of “Computer operator” in The Passport office in Pune.

b) Write a complaint to the Commissioner of Police about the nuisance caused by garbage in your area.

**Q.2) Conversation (Any one)** **(4)**

1) Write a conversation between Shyam and booking officer at the airport, as the Shyam wishes to travel to Chennai for an urgent work.

2) Write a conversation between you and your friend on the movie which you have seen a day before.

**Q.3) Read the following passage carefully and write down the summary of one third in length.** **(2)**

Everyone likes receiving a bouquet, but often one finds that the flowers die out in a few days : With a little care, you can make them stay fresh for a number of days. Water is important in order to allow the flowers to stay fresh longer. Most floral arrangements in baskets or other fancy containers do not have much water in them. Always check the oasis on which the flowers are placed for water. Alternately, remove them from the fancy packaging and place in a big vase.

**Q.4) Write a paragraph on one of the following. (any four)** **(4)**

a) How can I reach my goal?

b) Pets are the best stress busters.

c) Hard work is always a winner

--------------------

# मराठी (MG – 3) प्रश्नपेढी

**कमला**

१. ‘कमला’ या नाटकातील प्रमुख पात्रांचा थोडक्यात परिचय करून द्या.
२. ‘कमलाच्या’ येण्यामुळे सरिताच्या भावविश्वात कोणती खळबळ निर्माण होते? का?
३. ‘कमला’ या नाटकाचा शेवट तुम्हास पटतो काय? कारणासहित स्पष्ट करा.
४. ‘सरिता आणि जयदेव यांच्यात ‘कमला’ च्या निमित्ताने अंतर निर्माण होते. ’ – या विधानाची चर्चा करा.
५. वर्तमानपत्रातील विश्वाचे कोणते दर्शन ‘कमला’ नाटकातून घडते?
६. काकासाहेब आणि जयसिंग – या दोघांच्या पत्रकारितेत फरक आहे का? कोणता?
७. जयसिंगची ‘कमला प्रकरणा’ तील भूमिका कोणती आहे?
८. ‘कमला’ नाटकाच्या आधारे तेंडुलकरांच्या संवादलेखनाची कोणती वैशिष्ट्ये दिसून येतात?
९. टिपा द्या.
   अ) सरिता
   ब) जयसिंग
   क) काकासाहेब
   ड) कमला
   इ) नाटकातील दुय्यम व्यक्तिरेखा
   फ) नाटकातून निर्माण होणारे प्रश्न

**जरा जाऊन येतो.**

१. दि. बा. मोकाशी यांच्या ‘जरा जाऊन येतो’ या कथासंग्रहातील तीन कथांची आशयसूत्रे स्पष्ट करा.
२. ‘मोकाशींचे कथाविश्व प्रामुख्याने मध्यमवर्गीय अनुभवांशी निगडीत आहे.’ या विधानाची चर्चा करा.
३. मोकाशींच्या कथेतील प्रेमानुभवाचे चित्रण कसे आहे? कथांच्या आधारे स्पष्ट करा.
४. ‘मोकाशींच्या कथा त्यांचा चिंतनशीलतेचा प्रत्यय देतात’ – या विधानाची चर्चा करा.
५. मोकाशींच्या कथेची वाङ्मयीन वैशिष्ट्ये ‘जरा जाऊन येतो’ या कथासंग्रहाच्या आधारे स्पष्ट करा.
६. टिपा लिहा.
   अ) रामजी (आता आमोद सुनासि आले)
   ब) ‘पुण्याची मुलगी’ या कथेतील विनोद
   क) ‘वास्तु’ या कथेतील अनुभव
   ड) ‘वणवा’ या कथेच्या शीर्षकाची समर्पकता
   इ) ‘जरा जाऊन येतो’ मधील अनुभव

**विद्रोही कविता**

१. ‘विद्रोही कविता’ या काव्यसंग्रहातून विद्रोही भावनेचा तीव्र प्रत्यय येतो. – या विधानाचा परामर्श घ्या.
२. दलितांनी कोणत्या प्रकारचा लढा दिला पाहिजे असे कवींना वाटते? कशासाठी?
३. ‘इमारत जुनाट झाली’ असे म्हणण्यातून कवी अमरशेख यांना काय सुचवायचे आहे?
४. ‘विद्रोही कविता या संग्रहातून विविध कवींची वेदना व दुःखे बोलकी झाली आहेत’ – या विधानाची चर्चा करा.
५. ‘तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा’ असे कवी का सांगतात? त्यामधून त्यांना काय सुचवायचे आहे?
६. ‘मी निराश नाही रे’ या अर्जुन डांगळे यांच्या कवितेतून कोणता आशावाद प्रकटतो?

७. 'उधाणलोय' या कवितेतून कवीची लढाऊ वृत्ती कशी प्रकटली आहे?
८. 'वैरी' या कवितेतून कवींची बंडखोर वृत्ती कशी प्रकटते?
९. 'विद्रोही कविता' या संग्रहातील कवितांतून उपरोध कसा प्रकटतो ते सोदाहरण लिहा.
१०. टिपा लिहा.
   १) 'विद्रोही कविता' संग्रहातील सूर्य प्रतिमा
   २) दलित कवींचा संघर्ष
   ३) दलित कवींची वेदना

**११. संदर्भासह स्पष्ट करा.**

| | | |
|---|---|---|
| १) | 'नाही लढल्याविण मुक्ती' | (कविता - १) |
| २) | 'मानवतेचे नवीन मंदीर येथे बांधा या जागेवर' | (कविता - ७) |
| ३) | 'बरे झाले नसते' | (कविता - ५६) |
| ४) | 'यात माझा काय दोष हे मला सांगशील का?' | (कविता - ६०) |
| ५) | 'राणी, प्रकाशयुगाचा ठेवा माझ्या डोळ्यांत' | (कविता - ६२) |
| ६) | 'इथे भीक मागून काहीच मिळत नसते' | (कविता - ६७) |

❁❁❁

# तृतीय वर्ष (स्पेशल विषय)
## आर्थिक भूगोल (GS - 3)

**प्रश्न १) आर्थिक भूगोलाचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – आर्थिक भूगोलाची व्याख्या

मुद्दे – स्वरूप, नैसर्गिक पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीचे मूल्यमापन करणे, राष्ट्रीय विकासाची संरचना समजून घेणे, प्रदेशाचे आर्थिक नियोजन, विकसित, विकसनशील व अविकसीत प्रदेशातील विकास अवस्था समजते, वर्तमानकालीन आर्थिक स्थितीचा अभ्यास, देशातील सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्येमागील कारणे.

व्याप्ती – मानवाचा पर्यावरणाशी असलेला संबंध, सामाजिक बदलाचा अभ्यास, वेगवेगळ्या प्रदेशातील साधनसंपत्तीचा अभ्यास, राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न, आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक घटकांचे विश्लेषण इत्यादी मुद्यांचे उदाहरणासह स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

**प्रश्न २) आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम करणारे घटक उदाहरणासह स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – आंतरराष्ट्रीय व्यापार हा देशाची आर्थिक परिस्थिती, व्यापाराचे स्वरूप, भौगालिक स्थान, देशादेशातील संबंध यावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो.

मुद्दे – लोकसंख्येचे असमान वाटप, परराष्ट्रीय भांडवल, युद्ध व शांतता, लोकांची आवड, चालीरिती, आर्थिक विकासातील तफावत, दरडोई उत्पन्न, करविषयक धोरण, आर्थिक मैत्रीपूर्ण संबंध, जाहिरातबाजी, वाहतुकीच्या सुविधा, सांस्कृतिक भिन्नता, सरकारी धोरण इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

**प्रश्न ३) उद्योगांच्या स्थानिकीकरणावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – उद्योग व व्यवसाय हे आर्थिक विकासाचा पाया होय. ज्या प्रदेशात उद्योगातून फायदा अधिक होतो अशा प्रदेशात उद्योगाची उभारणी होते.

**मुद्दे** – कच्चा माल, नाशवंत कच्चा माल, वजनाने जड व आकाराने मोठा कच्चा माल, वजनात घट होणारा कच्चा माल, वजनात घट न होणारा कच्चा माल, उद्योगामध्ये तयार होणारा पक्का माल, शक्तीसाधने, मजुरपुरवठा, कुशल मजूर, अकुशल मजूर, व्यवस्थापकीय अधिकारी, भांडवल, वाहतूक, बाजारपेठ, शासकीय धोरणे, पाणीपुरवठा, हवामान, अन्य घटक इत्यादी मुद्द्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

१) **आर्थिक भूगोलाच्या शाखांचे सविस्तर वर्णन करा.**

**प्रस्तावना** – साधनसंपत्तीची उपलब्धता, वितरण, उत्पादन, उपभोग यांचा अभ्यास, स्वतंत्र अभ्यास पद्धती वापरून करता यावा म्हणून आर्थिक भूगोलाचे वेगवेगळ्या शाखांमध्ये विभाजन करण्यात आले आहे.

मुद्दे – साधनसंपत्ती भूगोल, कृषी भूगोल, औद्योगिक भूगोल, व्यापारी भूगोल, वाहतूक भूगोल, विपणन भूगोल, पर्यटन भूगोल इत्यादी शाखांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

२) **खनिज संपत्तीची वैशिष्ट्ये लिहा.**

**प्रस्तावना** – खनिज संपत्तीवर औद्योगिक विकास अवलंबून असतो.

मुद्दे – खनिजांचे वितरण असमान, खनिजे, सहजपणे उपलब्ध होत नाही, खनिजे क्षय पावतात, खनिजे, अशुद्ध स्वरूपात सापडतात, भूपृष्ठावर खोलवर आढळतात, औद्योगिक परिसरात खाणिचे स्थान महत्त्वाचे, खनिज उत्पादनावर हवामानाचा परिणाम इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

३) **आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे लिहा.**

**प्रस्तावना** – आंतरराष्ट्रीय व्यापाराची व्याख्या

मुद्दे – इतर देशातील वस्तूची देवाण घेवाण, जास्त वस्तू असल्याने निवड करता येते, नैसर्गिक समस्येवर मात करता येते, साधन संपत्तीचा पुरेपुर वापर, दुर्मिळ साधनसंपत्तीचा उपभोग, इतर देशाशी संबंध, वैचारिक व संस्कृतीची देवाण घेवाण इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

४) **वाहतुकीवर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासात वाहतूक महत्त्वाची असते.

मुद्दे – भूरचना, हवामान, जंगले, वाळवंटी प्रदेश, सांस्कृतिक घटक, राजकीय घटक, लोकसंख्या, आर्थिक घटक इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे गरजेचे आहे. **समारोप**

**प्रश्न ५) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **आर्थिक भूगोलाचे महत्त्व**

**प्रस्तावना** – आर्थिक भूगोलाची व्याख्या

मुद्दे – शेतीविषयक, उत्पादन – उद्योगधंदे विषयक, आर्थिक धोरण, प्रशासक, राजनीती विषयक, संरक्षण विषयक, नागरिक विषयक, संशोधन विषयक इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

२) **आर्थिक विकासात शेतीचे महत्त्व**

**प्रस्तावना** – विकसनशील देशात शेती व्यवसायात गुंतलेल्या लोकांची संख्या जास्त असल्याने आर्थिक विकासात शेतीची भूमिका महत्त्वाची ठरते.

मुद्दे – वाढत्या लोकसंख्येला उत्पादक, उद्योगांना कच्चा माल, औद्योगिक उत्पादनासाठी बाजारपेठ उद्योग क्षेत्रासाठी श्रमाचा पुरवठा, अन्नधान्याचा साठा, परकीय चलन इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

३) **आर्थिक विकासातील उद्योगधंद्याचे महत्त्व**

**प्रस्तावना** – एखाद्या देशाचा आर्थिक विकास झाला आहे याचे मूल्यमापन हे त्या देशातील उद्योगधंद्याच्या स्थितीवर अवलंबून असते.

मुद्दे – उत्पन्नातील दरी कमी करणे, बेकाराचे प्रमाण कमी करणे, उत्पादनात वाढ, शेतीक्षेत्राचा विकास, स्वावलंबन, बचत, नैसर्गिक साधनाचा अधिकाधिक वापर, निर्यातीत वाढ, रोजगारात वाढ, मूलभूत सेवांचा विकास, औद्योगिक संस्कृतीचा विकास. **समारोप**

४) **नळ वाहतूक**

**प्रस्तावना** – पूर्वीपासून नळाद्वारे पाण्याची वाहतूक केली जाते; परंतु आधुनिक काळात खनिज तेल, पेट्रोल, तेल इत्यादींची वाहतूक नळाद्वारे मोठ्या प्रमाणात केली जाते.

मुद्दे – नळवाहतुकीची वैशिष्ट्ये, नळवाहतुकीच्या मर्यादा, नळ वाहतुकीचे जागतिक वितरण इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

❁❁❁

# राजकीय भूगोल (GS - 4)

**प्रश्न १) राजकीय भूगोलाचे इतर सामाजिक शास्त्रांशी संबंध स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – राजकीय भूगोल हा विषय अनेक पदरी आणि आंतर विद्याशाखीय असल्याने त्याचा विविध सामाजिक शास्त्राशी संबंध येतो.

मुद्दे – मानवी भूगोल, समाजशास्त्र, लोकसंख्या शास्त्र, मानववंश शास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, नीतीशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, भूराजनीती, आंतरराष्ट्रीय संबंध, लष्करी भूगोल इत्यादी मुद्यांचे सविस्तर स्पष्टीकरण करा. **समारोप**

**प्रश्न २) सीमा विषयी सविस्तर माहिती लिहा.**

**प्रस्तावना** – राजकीय प्रदेशाची अंतिम मर्यादा ज्या रेषेने दाखविली जाते त्या रेषेस सीमा असे म्हणतात.

मुद्दे – सीमांचे गुण विशेष, सीमांचे वर्गीकरण, नैसर्गिक सीमा, सांस्कृतिक सीमा, गणितीय किंवा भूमितीय सीमा, संकल्प सीमा या सर्व मुद्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

**प्रश्न ३) राष्ट्रनिर्मितीचे घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – राष्ट्रीयत्वाची भावना ज्या घटकांमुळे दृढ होते, त्या घटकांनाच राष्ट्र निर्मितीचे घटक असे म्हणतात.

**मुद्दे** – समान भूप्रदेश, वांशिक एकता, संस्कृती, भाषा व लिपी, इतिहास, समान राजकीय आकांशा, आर्थिक हितसंबंध, एकात्म शासनसंस्था, राष्ट्रीयत्व इत्यादी मुद्द्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक.

**समारोप** – राष्ट्रीयता धर्माशी निगडीत धर्माधिष्टित देश किंवा राष्ट्रे निर्माण झालेली आहेत.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

**१) राजकीय भूगोलाची व्याप्ती स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – राजकीय भूगोल हा विस्तृत व बहुविध पैलू असलेला विषय आहे त्यामुळे या विषयाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर आहे.

मुद्दे – राज्य व राष्ट्र याचे भौगोलिक तादात्म्य, राज्याची साधनसंपत्ती, लोकसंख्येची सामाजिक सलग्नता, राज्याचे मैत्रीसंबंध, व्यापार, गतिमान शास्त्र, विकास या मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. **समारोप**

**२) भूराजनीतीमधील संकल्पना स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – भूराजनीतीची व्याख्या

मुद्दे – सजीव राज्य, विस्तृत प्रदेश, जर्मन वंशाची श्रेष्ठता, भूसत्ता विरूद्ध नाविक सत्ता या मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. **समारोप**

**३) सागरी स्थानांच्या प्रकाराची सविस्तर माहिती लिहा.**

**प्रस्तावना –** सागरातील किंवा सागरी किनाऱ्यावरील स्थानास सागरी स्थान म्हणतात.

**मुद्दे** – एक सागरी स्थान, द्वि सागरी स्थान, त्रिसागरी स्थान, बहुसागरी स्थान, खंडीत स्थान इत्यादी मुद्द्यांचे. उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप.**

**४) हिंद महासागराचे भूराजनीतीक महत्त्व स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – प्राचीन काळापासून राष्ट्राच्या आर्थिक राजकीय स्थितीवर महासागराचा प्रभाव पडलेला आहे.

मुद्दे – महासागराची उत्पत्ती, तळरचनेत विविधता, किनारवर्ती भागातील साम्राज्य, व्यापारी सीमा, साधन संपत्तीचा शोध, सागरसंपत्ती इत्यादी मुद्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

**प्रश्न ५) टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

१) **राजकीय भूगोलाचे स्वरूप**

**प्रस्तावना –** राजकीय भूगालाची व्याख्या

मुद्दे – राजकीय एकक, पर्यावरण व समाज, राज्याचे परिवर्तनीय स्वरूप इत्यादी मुद्यांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

२) **मॅकींडरचा सिद्धान्त**

**प्रस्तावना** – मॅकींडर यांनी मांडलेला सिद्धान्त निसर्गवादावर भूसत्ता व नाविक सत्ता यांच्या तौलनिक सामर्थ्यावर आधारलेला आहे.

मुद्दे – सिद्धान्ताची मूलतत्वे, सिद्धान्ताचे महत्त्व, मॅकींडर यांचे भाकित, सिद्धान्तावरील टीका इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

३) **भारताच्या सीमारेषा**

**प्रस्तावना** – भारत देश द्वीकल्पीय देश असून तीन बाजुने समुद्र किनारा आहे. तसेच विविध सीमा रेषा आहेत त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

मुद्दे – भारत – पाकिस्तान सीमारेषा, भारत – बांग्लादेश सीमारेषा, भारत – नेपाळ, भारत – म्यानमार या सीमारेषेचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

४) **शासनसंस्था**

**प्रस्तावना** – शासनसंस्था ही राज्याची एक संघटना असू शकते.

मुद्दे – सीमांचे रक्षण, नैसर्गिक संपत्तीचे रक्षण, एकसंध समाज निर्माण करणे, निसर्गाचे संवर्धन इत्यादी मुद्यांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक. **समारोप**

❁❁❁

# सामाजिक संशोधन पद्धती (SS - 3)

**प्रश्न १) मुलाखततंत्राचे गुण - दोष विषद करा.**

**प्रास्ताविक** - तथ्यसंकलनाच्या पद्धतीमध्ये मुलाखत ही महत्त्वाची पद्धत असून ती आजही वापरली जाते. या पद्धतीमध्ये काही गुण तसेच काही दोषही आहेत.

गुण - सर्व प्रकारच्या माहितीचे संकलन, भूतकालीन घटनांचे अध्ययन, अमूर्त व अदृश्य घटनांचे अध्ययन, पर्याप्त मानसशास्त्रीय अध्ययन, बहुपक्षीय आणि सखोल अध्ययन, पारस्परिक प्रेरणात्मक अध्ययन, माहितीची सत्यता पडताळून बघण्याची शक्यता.

दोष - विस्मरणाची शक्यता, व्यक्तिगत पूर्वग्रह, मुलाखतदात्यावर अवलंबून असणे, न्युनगंडाची भावना, प्रशिक्षित मुलाखतकर्त्याची आवश्यकता, अधिक वेळेची आवश्यकता. सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि भाषेची समस्या, सदोष अहवाल. **समारोप**

**प्रश्न २) चित्र सादरीकरणाचे नियम, महत्त्व व मर्यादांची चर्चा करा.**

**प्रस्तावना -** तथ्यांना अधिक प्रभावी पद्धतीने स्पष्ट करण्यासाठी चित्रांचा उपयोग केला जातो.

चित्र सादरीकरणाचे नियम - आकर्षकता, प्रमाणित आकार, वास्तविक अभिव्यक्ती, भूमितीय शुद्धता, मापन, उपयुक्त शीर्षक, शब्दांचा आणि संख्यांचा कमी उपयोग, स्पष्ट विभाजन, व्यवस्थित रचना, उपयुक्त निवड,

चित्र सादरीकरणाचे महत्त्व - आकर्षक आणि परिणामकारक सादरीकरण शक्य, चित्रे तथ्यांना साधे आणि समजण्यायोग्य बनवितात, सहजपणे तुलना शक्य, वेळेची बचत, संशोधनात उपयोगी, एका दृष्टिक्षेपात स्पष्ट होणे, गुणात्मक तथ्यांचे सादरीकरण, प्रचाराचे साधन, भविष्यकथन,

मर्यादा - सविस्तर विश्लेषण अशक्य, केवळ सजातीय, तथ्यांचे सादरीकरण शक्य, यथार्थ माप अशक्य, केवळ तुलनात्मक तथ्यांचे सादरीकरण, पूर्वग्रहाची शक्यता, प्रमाणबद्ध सादरीकरण. **समारोप**

**प्रश्न ३) अहवाल लेखन म्हणजे काय? अहवाल लेखनाचे उद्देश स्पष्ट करा.**

**प्रास्ताविक -** अहवाल लेखन हा संशोधन प्रकल्पातील अंतिम टप्पा होय. अभ्यासकाने अशा प्रकारचे लेखन करताना विशेष काळजी घ्यावी लागते.

**अर्थ** - प्रो. हंसराज यांचे मत. संपूर्ण संशोधन कार्याची कलाकौशल्याचा वापर करून लिखित स्वरूपात केलेली मांडणी म्हणजेच अहवाल लेखन होय.

**उद्देश -** ज्ञानाचा प्रसार, निष्कर्षाची यथार्थता, नवीन संशोधन कार्याला चालना, धोरण व उपाय ठरविणे.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

**१) तथ्यांची कार्ये लिहा.**

कार्ये - सिद्धान्ताला चालना, सिद्धान्ताची पुनर्रचना शक्य, नवीन तथ्यांशी विसंगत असणाऱ्या सिद्धान्ताचा त्याग, संशोधन निर्मितीची नवीन दिशा तथ्यांमुळे मिळते. सिद्धान्ताचे स्पष्टीकरण.

**२) उपयोगी गृहितकृत्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

वैशिष्ट्ये - गृहितकृत्य हे संकल्पनात्मक दृष्ट्या स्पष्ट असावे. गृहितकृत्याचा संबंध अनुभवाधिष्ठित प्रयोगसिद्धतेशी असावा, गृहितकृत्य हे विशिष्ट असावे. गृहितकृत्य उपलब्ध तंत्राशी संबंधीत असावे, गृहितकृत्याचा संबंध सिद्धान्त समूहाशी असावा. गृहितकृत्य हे साधे व सरळ असावे. गृहितकृत्य हे समस्येचे पर्याप्त उत्तर असावे.

३) **अनुसूचीचे महत्त्व लिहा.**

महत्त्व - यथार्थ आणि ठोस माहितीची प्राप्ती, प्रश्नांचे स्पष्ट व वास्तविक उत्तर, व्यक्तिगत संपर्क, संशोधनकर्त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव, संशोधनकर्त्याच्या निरीक्षण शक्तीचा विकास, माहिती संकलनाच्या प्रक्रियेस संक्षिप्त करणे, लिखित सामग्री, नमुना निवडीसंबंधी दोषाचे ज्ञान, अधिक उत्तरे, अनुसूचीत मानवी तत्त्वे

४) **नमुना निवडीच्या समस्या स्पष्ट करा.**

समस्या - १) नमुन्याच्या आकाराची समस्या २) पूर्वग्रहदूषित नमुन्याची समस्या - नमुन्याचा आकार खूप लहान असल्यास तो प्रातिनिधीक राहत नाही, दोषपूर्ण वर्गीकरण, उद्देशपूर्ण नमुना, साधनसूची अपूर्ण, दोषपूर्ण यादृच्छिक नमुना, अध्ययन विषयाचे जटिल स्वरूप.

**प्रश्न ५) टिपा लिहा (कोणत्याही दोन)**

१) **अन्वेषणात्मक संशोधन आराखडा**

अर्थ, अन्वेषणात्मक अध्ययनासाठी आवश्यक ज्ञान मिळावे म्हणून पुढील तीन गोष्ट महत्त्वाच्या - साहित्य सर्वेक्षण, सर्वेक्षण, अंतरदृष्टीस प्रेरणा देणाऱ्या घटनांचे विश्लेषण, अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचे मुख्य कार्य/उद्देश

२) **सहभागी निरीक्षण**

अर्थ, गुण आणि दोष/मर्यादा
गुण - प्रत्यक्ष अध्ययन, सखोल व सूक्ष्म अध्ययन, वास्तविक व्यवहाराचे अध्ययन, संकलित माहितीची पडताळणी, अतिशय सोपे अध्ययन
दोष आणि मर्यादा - दीर्घ कालावधी, पूर्ण सहभाग अशक्य, अपरिचितपणाचा लाभ शक्य नाही, समूह व्यवहारात परिवर्तन, वस्तुनिष्ठता शक्य नाही, अधिक खर्चाची पद्धत.

३) **गुणात्मक संशोधनाची वैशिष्ट्ये**

अन्वेषणात्मक आणि वर्णनात्मक दृष्टिकोन, उदयोन्मुख आराखडा, सहेतूक/उद्देशपूर्ण नमुना, नैसर्गिक वातावरणामध्ये आधारसामग्रीचे संकलन, व्यक्ती एक साधन यावर भर, आधारसामग्री गोळा करण्याच्या गुणात्मक पद्धती, सुरुवातीच्या आणि अखंड विगमनात्मक तथ्यांचे विश्लेषण, निष्कर्षांसाठी व्यष्टी अध्ययन पद्धतीचा दृष्टिकोन.

४) **सामाजिक संशोधनातील आलेखांची उपयुक्तता**

सामाजिक संशोधनात आलेखांची विशेष उपयोगिता आहे. ती पुढीलप्रमाणे - परस्परसंबंधांचे प्रदर्शन, यथार्थ प्रदर्शन, तुलनात्मक अध्ययन, तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन, परिवर्तनाची दिशा आणि मात्राचे ज्ञान, भविष्यकथन, कमी खर्च.

# औद्योगिक समाजशास्त्र (SS- 4)

**प्रश्न १) श्नायडर यांनी सांगितलेली कार्यकारीची तीन कार्ये विशद करा.**

**प्रस्तावना** – उद्योगधंद्यात कार्यकारीची भूमिका महत्त्वाची, त्याची कार्ये वैशिष्ट्यपूर्ण व बहुविध.
श्नायडर यांनी सांगितलेली तीन कार्ये – १) संघटनेची उद्दिष्टे निश्चित करणे २) महत्त्वाच्या बाह्य शक्तींशी उद्योगधंद्याचा संबंध प्रस्थापित करणे ३) उद्योगधंद्यातील अंतर्गत व्यवहारांचे संचालन करणे. **समारोप**

**प्रश्न २) भारतातील 'औद्योगिक कलह कायदे' यावर टिपण तयार करा.**

**प्रास्ताविक** – शासनाच्या हस्तक्षेपाशिवाय औद्योगिक कलह उग्र बनण्याची शक्यता असते. इ. स. १९२९ मध्ये पहिला कायदा शासनाने मंजुर केला.
कायदे – १) १९२९ चा कलह कायदा २) भारत संरक्षण कायदा ३) औद्योगिक कलह (निवारण) कायदा १९४७ – या कायद्याअंतर्गत प्रतिबंधात्मक उपाययोजनेची यंत्रणा. **समारोप**

**प्रश्न ३) भारतातील कामगार संघटनांच्या प्रगतीतील अडथळ्यास कारणीभूत घटक स्पष्ट करा.**

**प्रस्तावना –** औद्योगिकीकरणातून निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी कामगार संघटना आवश्यक, भारतातील कामगार संघटना इतर देशांतील कामगार संघटनांशी तुलना करता फारच मागे आहेत.
**प्रगतीतील अडथळे –** अंतर्गत घटक – कामगारांचे अज्ञान व निरक्षरता, कामगारातील एकजुटीचा अभाव, कामगारांची स्थलांतर करण्याची घातक प्रवृत्ती, तुटपुंजे वेतन, संघटनेचे नेतृत्त्व कामगारातून नाही. राजकीय पक्षांचे वर्चस्व. त्यामुळे कामगारांच्या हितापेक्षा राजकीय हितसंबंधांची जपणूक, संघटनेचा कामगारांच्या जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श नाही. सतत श्रम करण्याने संघटनेच्या कामात रस घेण्याची शक्ती कामगारामध्ये उरत नाही.
**बर्हिगत घटक** – मालक वर्गाचा दृष्टीकोन, कामगारांची भरती पद्धती, सरकारचा दृष्टीकोन.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

१) **औद्योगिक समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व लिहा.**
औद्योगिक समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व विशद करताना समाजशास्त्रज्ञांनी पुढील मुद्दे मांडले आहेत – मानवी ज्ञानात वाढ, वैज्ञानिक ज्ञानात वाढ, औद्योगिक समाजाच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी, औद्योगिक समाजाच्या स्थिरतेसाठी, व्यक्तिगत एकतेला मदत व्हावी म्हणून, कौटुंबिक एकतेला मदत होण्यासाठी, व्यवसायांच्या संधी, समाज आणि कामगार कल्याण साधण्यासाठी, औद्यागिक नियोजनासाठी, शांतता व उत्कर्ष यासाठी.

२) **अधिकारी तंत्राची वैशिष्ट्ये लिहा.**
वैशिष्ट्ये – श्रेणीरचना, कार्यविभाजन, तज्ञांची नियुक्ती, लिखित नियमांचे महत्त्व, संदेशवाहन पद्धती, पद व पदाधिकारी यांचे संबंध

३) **कार्यकारीच्या भूमिकेवर प्रभाव पाडणारे घटक कोणते?**
घटक – १) उद्योगधंद्याचा हेतू – नफा २) तांत्रिक प्रक्रिया ३) अधिकारी तंत्र

४) **फोरमनच्या भूमिकेवरील ताण स्पष्ट करा.**
ताण – १) उद्योगधंद्यातील विशिष्ट हितसंबंध असणाऱ्या गटातील संघर्ष २) विशेषज्ञांचे दबाव ३) कामगार संघटनांचा दबाव ४) फोरमनची उपेक्षा ५) फोरमनची स्थिती.

**प्रश्न ५) टिपा लिहा (कोणत्याही दोन)**

१) **हॉथॉर्न प्रयोगातील प्रकाशयोजना प्रयोग**
एल्टन मेयो यांच्या हॉथॉर्न प्रयोगामुळे औद्योगिक समाजशास्त्राच्या अभ्यासाला चालना या प्रयोगाच्या अंतर्गत प्रकाशयोजना प्रयोग, प्रयोगाचे उद्दिष्ट, कामगारांचे दोन गट, प्रयोगाचे निष्कर्ष

२) **मास्लो यांची गरजांची श्रेणी रचना.**
मास्लो यांनी गरजांची निकड लक्षात घेऊन गरजांची क्रमवार रचना केली, श्रेणी रचना - शारीरिक गरजा, सुरक्षितता - गरज, समाजिक गरजा, स्वगरज

३) **कामगार संघटनांचे मार्ग**
काही मार्गांचा अवलंब करून कामगार संघटनांना आपली उद्दिष्टे साध्य करून घ्यावी लागतात. मार्ग - परस्पर सहाय्य निधी, सामूहिक करार, कायद्याचा मार्ग.

४) **औद्योगिक कलहाचे परिणाम**
मालक व कामगार यांच्या परस्परविरुद्ध भूमिकेतून सुवर्णमध्य काढण्यात अपयश आल्यास औद्योगिक कलहाचे स्वरूप दिवसेंदिवस उग्र होऊ लागते.
परिणाम - समाजावर, कामगार वर्गावर, मालक वर्गावर होणारे परिणाम.

❁❁❁

# भारताचे परराष्ट्र धोरण (PS - 3)

**गृहपाठ १) भारत आणि अमेरिका संबंधाची चर्चा करून भारत आणि अमेरिकेच्या सहकार्याच्या नवीन धोरणावर प्रकाश टाका.**

**प्रस्तावना** - १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लगेचच अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारले. सुरुवातीला अमेरिकेने भारताशी मैत्री दाखविली, परंतु अलिप्ततेच्या नावावर भारताने ती नाकारली.

भारत आणि अमेरिका संबंध -

१) भारताच्या अलिप्तावादी धोरणाकडे अमेरिकेने साशंकतेने पाहिले.

२) आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत दोन्ही राष्ट्रांची परस्परविरोधी भूमिका, उदाहरणार्थ - साम्यवादी चीनला भारताने दिलेली मान्यता, बर्लिनचा प्रश्न, व्हिएतनामचा प्रश्न, भारताचे रशियाकडे झुकणे. इत्यादींमुळे भारत व अमेरिका यांच्यातील संबंधांमध्ये चढ - उतार आल्याचे दिसून येते. अमेरिकेला भारताबद्दल अविश्वास.

३) १९६२ च्या भारत - चीन युद्धात अमेरिकेचा भारताला राजकीय पाठिंबा

४) १९६५ च्या भारत - पाक युद्धात अमेरिकेचा पाकिस्तानला पाठिंबा, त्यामुळे भारत - अमेरिका या दोन देशात कटुता निर्माण झाली.

५) १९७१ साली बांगलादेशाच्या स्वातंत्र्यासाठी भारताने लष्करी कारवाई केली. त्यावेळी अमेरिकेचे धोरण पक्षपाती होते. अमेरिकेने भारतावर लष्करी दबाव आणण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेचे आरमार बंगालच्या उपसागरात आले.

६) १९७३-७४ यादरम्यान दोन्ही देशांचे संबंध सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू झाले. या दोन्ही देशांत आर्थिक, व्यापारी, वैज्ञानिक, तांत्रिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संबंध जोपासण्याचा प्रयत्न करण्यात आला.

७) १९७४ मध्ये भारताने अणुस्फोट घडवून आणला. भारताच्या या कृतीचा अमेरिकेने तीव्र निषेध करून भारतावर आर्थिक निर्बंध लादले.

८) १९९१ च्या रशियाच्या विघटनामुळे भारताला अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याशिवाय पर्याय उरला नाही.

९) १९९८ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांची भारत भेट त्यामुळे मैत्रीपूर्ण व सहकार्याचे संबंध प्रस्थापित होण्यास सुरुवात.

१०) २००१ मध्ये अमेरिकेवर दहशतवादी हल्ला, त्यामुळे भारताच्या दहशतवाद विरोधी मोहिमेस सहकार्य करण्याचे अमेरिकेने जाहीर केले.

११) २००८ मध्ये भारत - अमेरिका यांच्यात अणुऊर्जा करार, या करारामुळे भारत - अमेरिका संबंध आणखी घनिष्ट होण्यास मदत. परंतु अण्वस्त्र निर्माण करणार नाही, या अटीवरच अमेरिका भारताला अणुइंधन पुरवणार.

**समारोप** - वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ २) भारत आणि चीन संबंधांवर टिपण लिहा.**

**प्रस्तावना** - भारत व चीन या दोन प्राचीन देशांमधील संबंध हे ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत सलोख्याचे व सहकार्याचे होते. याबाबत थोडक्यात लिहिणे.

भारत आणि चीन संबंध -

१) सीमावाद (सीमासंघर्ष/सीमावादाचा प्रश्न) २) तिबेटचा प्रश्न - तिबेटच्या प्रश्नावरून भारत - चीन संबंधामध्ये तणाव निर्माण झाला. ३) १९५४ मध्ये भारत - चीन यांच्या दरम्यान करार, यात भारताने तिबेट

हा चीनचा अविभाज्य भाग असल्याचे मान्य केले. ४) १९५५ व त्यानंतरच्या काळातही सीमावादाच्या प्रश्नावरून भारत-चीन संबंधामध्ये तणाव, चीनने लडाख व अक्साई चीन या भागात घुसखोरी करून काही भारतीय प्रदेशावर ताबाही मिळवला. ५) १९६२ मध्ये चीनचे भारतावर आक्रमण ६) १९६५ आणि १९७१ च्या भारत - पाकिस्तान युद्धांत चीनने पाकिस्तानची बाजू उचलून धरली. तसेच चीनची काश्मीर प्रश्नासंबंधीची भूमिका पाकिस्तान धार्जिणी होती. ७) १९७४ मध्ये सिक्कीमचे भारतात विलीनीकरण, पोखरण येथे अणुस्फोट या दोन्ही घटनांचा चीनकडून निषेध ८) १९७५ मध्ये राजनैतिक संबंधास पुन्हा सुरुवात ९) २००४ मध्ये सीमारेषेवरील व्यापार वाढावा या उद्देशाने भारत व चीन सीमेवरील नथूला खिंड व्यापारासाठी मुक्त करण्यात आली.

**समारोप** - चीनपासून भारताने नेहमी सावध असणे अतिशय गरजेचे आहे. हे वरील भारत आणि चीन यांच्या संबंधातून निदर्शनास येते.

**गृहपाठ ३) भारत आणि रशिया संबंधांची १९९१ नंतर झालेल्या बदलांसह चर्चा करा.**

**प्रस्तावना -** अगदी प्रारंभी या दोन देशातील संबंध आजच्या एवढे मित्रत्वाचे नव्हते. १९५० मध्ये चीनच्या साम्यवादी राजवटीला भारताने दिलेली मान्यता व भारताचा वसाहतवादाला असणारा विरोध यामुळे दोन्ही देशांचे संबंध वाढण्यास सुरुवात झाली.

भारत आणि रशिया संबंध -

१) १९५० नंतर संबंध वाढण्यास सुरुवात झाली. २) १९५६ साली सुवेझ कालव्याच्या प्रश्नात दोन्ही देशांची समान भूमिका ३) १९६२ च्या भारत - चीन युद्धात रशियाचा भारताला नैतिक पाठिंबा ४) १९६५ च्या भारत - पाक युद्धात रशियाने ताश्कंद करारात मध्यस्थ म्हणून भूमिका ५) १९७१ मध्ये भारत - रशिया यांच्यात मैत्री व सहकार्य करार ६) काश्मीर प्रश्नाबाबत रशिया भारताच्या बाजूने ठामपणे उभा राहिला. ७) आर्थिक, विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला रशियाने पूर्ण सहकार्य केले. ८) संरक्षण व अवकाश क्षेत्रातही भारताला महत्त्वपूर्ण मदतही रशियाने केली. ९) १९९१ मध्ये रशियाचे विघटन - रशियाच्या विघटनामुळे रशियाला भारताकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणातील महासत्ता म्हणून रशियाचे महत्त्व कमी झाले. तरी लष्करी साधनसामग्री पुरवण्याच्या क्षेत्रांत रशिया भारत सहकार्य अजूनही पूर्वीप्रमाणेच चालू आहे. मध्यंतरी अमेरिकेने भारताशी अणुऊर्जा करार केला. पण इंधन विनाअट पुरवण्यास नकार दिला. तेच इंधन रशियाने विनाअट त्वरित भारताला पुरवले. रशिया - भारत मैत्री महत्त्वपूर्ण आहे.

**समारोप** - वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा (कोणतेही दोन)**

**अ) अलिप्ततावादी चळवळीचे भवितव्य**

**प्रस्तावना** - अलिप्ततावादाचा अर्थ, व्याख्या, उदयाची पार्श्वभूमी किंवा स्वरूप याबाबत थोडक्यात माहिती लिहावी.

अलिप्ततावादी चळवळीचे भवितव्य - सध्याच्या परिस्थितीत अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त आहे का, असा प्रश्न केला जात आहे. कारण, दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या दोन महासत्ता, त्यांच्यातील संघर्ष, शीतयुद्ध, लष्करी करार व अण्वस्त्र स्पर्धा इत्यादींमुळे अलिप्ततावादी चळवळीची आवश्यकता होती. परंतु आता मात्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील परिस्थिती बदलली आहे. उदाहरणार्थ - १९९० नंतर रशियाचे झालेले विघटन, शीतयुद्धाची समाप्ती, अमेरिका ही एकमेव महासत्ता अस्तित्वात असणे इत्यादी कारणांमुळे अलिप्ततावादी उपयुक्तता (गरज) उरली नाही असे म्हटले जाते. मात्र असे जरी असले तरी आजही अलिप्ततावादी चळवळ उपयुक्त आहे. कारण सध्याची विश्वरचना एककेंद्री व अमेरिकेभोवती सत्तेचे केंद्रीकरण करणारी आहे. यासाठी सर्व आफ्रो - अशियाई राष्ट्रांनी एकत्र येणे आवश्यक आहे. आज जगातील

बहुतेक राष्ट्रांमध्ये गरीबी, बेकारी, उपासमार, भ्रष्टाचार, दहशतवाद इत्यादींसारखे प्रश्न व समस्या भेडसावत आहेत. म्हणूनच अलिप्ततावादी चळवळीचे भवितव्य उज्वल आहे. तसेच या चळवळीची जगाला गरज आहे.
**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**आ) 'जागतिकीकरणाची' संकल्पना विशद करा.**

**प्रस्तावना** – प्रस्तावनेमध्ये जागतिकीकरणाची व्याख्या व अर्थ लिहिणे अपेक्षित आहे. जागतिकीकरणाची संकल्पना – जागतिकीकरणाचे स्वरूप व व्याप्ती, तत्त्वे व वैशिष्ट्ये, फायदे व तोटे इत्यादी मुद्दे थोडक्यात स्पष्ट करणे.
**समारोप** – जागतिकीकरणाचे भारतावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम झालेले दिसून येतात.

**इ) 'पंडीत जवाहरलाल नेहरूंचे भारतीय परराष्ट्र धोरणातील योगदान.**

**प्रस्तावना** – भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे व तत्त्वे थोडक्यात लिहिणे. पंडीत नेहरू हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार –
१) पंडीत नेहरूंचे आदर्शवादी परराष्ट्र धोरण २) पंडीत नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावर पडलेला लोकशाही समाजवादाचा प्रभाव ३) पंडीत नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे मूलाधार – शांतता, निःशस्त्रीकरण, विकास, परस्परावलंबित्व ४) पंडीत नेहरूंचे अलिप्ततावादी धोरण ५) पंडीत नेहरूंचे पंचशील तत्त्वांचे धोरण इत्यादी मुद्यांच्या आधारे पंडीत नेहरू यांचे परराष्ट्र धोरण सविस्तर स्पष्ट करणे.
**समारोप** – पंडीत नेहरूंच्या परराष्ट्र धोरणावरून त्यांचा आदर्शवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद प्रतिबिंबित होतो. पंडीत नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार करताना भारताच्या वैश्विक भूमिकेवर भर दिला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंडीत नेहरूंचा प्रभाव, अलिप्ततावादी धोरण, पंचशील धोरणाचे तत्त्व इत्यादीबाबत सारांश रूपाने समारोप लिहावा.

**ई) भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना**

**प्रस्तावना** – संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, रचना, कार्य व योगदान याबाबत अगदी थोडक्यात लिहिणे.
भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना
१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यामध्ये भारताने बजावलेली भूमिका व योगदान याबाबत सविस्तर लिहिणे.
२) भारत आणि सुरक्षा परिषद – सुरक्षा परिषदेच्या कायमच्या सदस्यत्वासाठी भारताने आपली दावेदारी १९९४ मध्ये घोषित केली. आपली दावेदारी घोपित करण्याची कारणीमीमांसा स्पष्ट करणे. ३) सुरक्षा परिषदेच्या विस्ताराबाबत भारताची भूमिका विशद करणे. ४) सुरक्षा परिषदेच्या लोकशाहीकरणाचा प्रश्न याबाबत थोडक्यात लिहिणे.
वरील मुद्यांच्या आधारे भारत आणि संयुक्त राष्ट्र संघटना यांच्यातील संबंध थोडक्यात लिहिणे.
**समारोप** – संयुक्त राष्ट्र संघटनेचे यशापयश थोडक्यात लिहिणे. तसेच वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

## गृहपाठ ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)

**अ) 'भारत आणि अलिप्ततावादी चळवळ' यावर टिपण तयार करा.**

**प्रस्तावना** – अलिप्ततावादाचा अर्थ व व्याख्या लिहिणे.
भारत आणि अलिप्ततावादी चळवळ – अलिप्ततावादी चळवळीच्या उदयात आणि विकासात भारताचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे.

अलिप्ततावादाचा स्वीकार करणारा भारत हा पहिला देश आहे. भारताने या चळवळीच्या निर्मितीत केवळ पुढाकारच घेतला नाही, तर चळवळीचे नेतृत्वही केले. (इत्यादी मुद्यांच्या आधारे उत्तर लिहावे)

**समारोप** – भारताच्या अलिप्ततावादाचे मूल्यमापन आणि अलिप्ततावादी चळवळीचे भवितव्य याबाबतची माहिती सारांश रूपाने थोडक्यात लिहिणे.

**आ) 'सार्क' मधील भारताच्या भूमिकेचा थोडक्यात आढावा घ्या.**

**प्रस्तावना** – सार्कच्या निर्मितीची पार्श्वभूमी, सदस्य राष्ट्रे, सार्कची वाटचाल आणि भूमिका याबाबत अगदी थोडक्यात लिहिणे.

'सार्क' मधील भारताची भूमिका – सार्क कडे पाहण्याचा भारताचा दृष्टिकोन हा सकारात्मक राहिला आहे. सार्कच्या माध्यमातून दक्षिण आशियाई राष्ट्रांनी आपला आर्थिक व सामाजिक विकास साधावा असे भारताचे मत होते. सार्कच्या सदस्य राष्ट्रांपैकी इतरांच्या तुलनेत सर्वच क्षेत्रांमध्ये भारत श्रेष्ठ आहे. त्यामुळे दक्षिण अशियात भारताला वडिलबंधुची म्हणजेच Big Brother ची भूमिका पार पाडावी लागेल अशी जाणीव भारताला आहे. दक्षिण अशियाई राष्ट्रांमधील प्रत्येक प्रश्न शांतता, चर्चा आणि सहकार्याच्या माध्यमातून सोडविला जावा, ही भारताची भूमिका राहिली आहे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**इ) भारत – श्रीलंका संबंधाची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – भारत आणि श्रीलंका या दोन्ही ब्रिटिशांच्या वसाहती होत्या.

१९४७ मध्ये भारताला तर १९४८ मध्ये श्रीलंकेला स्वातंत्र्य प्राप्त झाले. भारत व श्रीलंका या दोन दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या समस्या समान आहेत.

भारत – श्रीलंका संबंध – श्रीलंकेत दोन प्रमुख वंश – सिंहली व तमिळ होय. यांच्यात वांशिक संघर्ष, तमिळांना पूर्वीपासूनच श्रीलंकेचे नागरिकत्व दिले नव्हते. श्रीलंकेमध्ये स्थायिक झालेल्या मूळ भारतीयांच्या नागरिकत्वाचा प्रश्न, भारतातील तमिळांचा केंद्र सरकारवर दबाव, भारताने श्रीलंकेत शांतिसैन्य पाठविले, शांतता प्रयत्नांना अपयश, यातूनच LTTE (लिट्टे) या संघटनेचा तमिळ भूमीच्या मागणीसाठी संघर्ष चालू, १९९१ मध्ये राजीव गांधी यांची हत्या, यानंतर भारताने श्रीलंकेतील आपले लक्ष कमी केले.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**ई) भारत – पाकिस्तान संबंध स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – १९४७ साली स्वातंत्र्यानंतर भारताची फाळणी होऊन स्वतंत्र पाकिस्तानची निर्मिती झाली. त्यावेळेपासूनच या दोन देशातील संबंध बहुतेक तणावपूर्ण राहिले आहेत.

भारत – पाकिस्तान संबंध –

१) काश्मीरचा प्रश्न २) नद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न ३) १९७१ मधील बांगलादेश युद्धात पाकिस्तानचा पराभव ४) १९७२ मध्ये सिमला करार ५) १९८९ पासून भारतविरोधी दहशतवादी कारवाया ६) १९९९ मध्ये कारगिल युद्ध – या युद्धात पाकिस्तानचा पराभव ७) २००१ मध्ये जनरल मुशर्रफ यांची भारत भेट – शांतता प्रक्रियेसाठी प्रयत्न ८) २६ नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबईवर दहशतवादी हल्ला – यामुळे दोन्ही देशांदरम्यान तणावपूर्ण परिस्थिती (इत्यादी मुद्यांच्या आधारे थोडक्यात लिहावे)

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

❆❆❆

# राजकीय समाजशास्त्र (PS - 4)

**गृहपाठ १) वर्तनवादाची वैशिष्ट्ये आणि दोष विशद करा.**

**प्रस्तावना** – सामाजिकशास्त्रात अधिक शास्त्रशुद्धता, वस्तुनिष्ठता येण्यासाठी प्रश्नावली, पाहणी, मुलाखती, माहिती गोळा करून तिचे विश्लेषण करणे इत्यादी तंत्रांचा वापर करण्यात येऊ लागला. यातूनच वर्तनवादाचा उदय झाला.

वर्तनवादाची वैशिष्ट्ये – १) नियमितता २) पुनर्तपासणी ३) योग्य तंत्रांचा वापर ४) संख्यात्मक ५) मूल्यनिरपेक्षता ६) पद्धतशीरपणा ७) शुद्ध विज्ञान ८) आंतरशास्त्रीय दृष्टीकोन इत्यादी

वर्तनवादावरील दोष – १) राज्यशास्त्राकडून राजकारणाकडे २) शास्त्रीयत्वाचा अतिरेक ३) मूल्य निरपेक्षता ४) स्थल-काल निरपेक्षता ५) अति तांत्रिकीकरण इत्यादी मुद्यांच्या आधारे वर्तनवादावरील दोष लिहिणे अपेक्षित आहे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे समारोप लिहावा.

**गृहपाठ २) राजकीय सामाजिकीकरणाची व्याख्या सांगा, राजकीय सामाजिकीकरणाच्या साधनांची चर्चा करा.**

**प्रस्तावना** – राजकीय सामाजिकीकरणाचे स्वरूप व वैशिष्ट्ये अगदी थोडक्यात स्पष्ट करणे.

राजकीय सामाजिकीकरणाची व्याख्या – डेव्हिड इस्टन, आमंड आणि पॉवेल, रश आणि अल्थॉफ यांच्यापैकी कोणत्याही दोन विचारवंतांच्या व्याख्या लिहिणे.

राजकीय सामाजिकीकरणाची साधने – १) कुटुंब व्यवस्था २) शिक्षण संस्था ३) राजकीय पक्ष ४) कार्यक्षेत्र ५) प्रसारमाध्यमे ६) दबावगट ७) सांस्कृतिक संस्था-संघटना ८) राजकीय व्यवस्थेशी संबंध इत्यादी साधने थोडक्यात स्पष्ट करणे.

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ ३) 'राजकीय श्रेष्ठजन' ही संकल्पना खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करा.**

**अ) राजकीय श्रेष्ठजनांचा आकृतिबंध**

**आ) राजकीय श्रेष्ठजन निर्मितीचे घटक**

**प्रस्तावना** – राजकीय श्रेष्ठजनाची व्याख्या व अर्थ लिहिणे.

राजकीय श्रेष्ठजन –

अ) **राजकीय श्रेष्ठजनांचा आकृतिबंध** – रॉबर्ट डाल या विचारवंताने राजकीय सत्ता शोधनासंबंधीचा आकृतिबंध मांडला. सर्वाधिक लोकसंख्येचा सामान्य जनतेचा स्तर असतो. यातील काहीच लोक सक्रिय राजकीय कार्यकर्ते बनतात. त्यातील काही थोडे प्रभावी लोकच राजकीय श्रेष्ठीजन बनतात. (आकृती आवश्यक)

आ) **राजकीय श्रेष्ठजन निर्मितीचे घटक** –

१) परंपरागत पद्धत

२) अर्जित पद्धत

३) नेमणुकीची प्रक्रिया

४) सत्तेची सोपान परंपरा

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

अ) **भारतातील राजकीय विकासाचे घटक आणि अडथळे स्पष्ट करा.**

**प्रस्तावना** – राजकीय विकासाचा अर्थ व व्याख्या लिहिणे.

भारतातील राजकीय विकासाचे घटक -
१) राजकीय संरचना २) राजकीय पक्ष ३) सरकार ४) प्रशासन  ५) पंचायत राज्य व्यवस्था
६) विविध चळवळी - सहकार चळवळी, स्त्रीमुक्ती चळवळ, दलित चळवळ इ. घटक थोडक्यात स्पष्ट करणे.
भारतातील राजकीय विकासातील अडथळे -
१) दहशतवाद २) दारिद्र्य, बेकारी व विषमता ३) भ्रष्टाचार ४) प्रादेशिकवाद ५) धार्मिकवाद ६) जातिवाद इ. अडथळे थोडक्यात लिहिणे.
**समारोप** - वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**आ) राजकीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि कार्ये स्पष्ट करा.**
**प्रस्तावना** - राजकीय व्यवस्थेच्या व्याख्या व अर्थ लिहिणे.
राजकीय व्यवस्थेची वैशिष्ट्ये - १) व्यापकता २) परस्परावलंबी ३) सीमारेषा
राजकीय व्यवस्थेची कार्ये - १) राजकीय भरती व राजकीय सामाजिकीकरण २) हितसंबंधाचे प्रकटीकरण ३) हितसंबंधाचे सुसूत्रीकरण ४) राजकीय संसूचन
**समारोप** - नियमांची निर्मिती, कायदे निर्मिती, कायद्यांची अंमलबजावणी आणि न्यायदान ही राजकीय व्यवस्थेची महत्त्वाची प्रदान कार्ये आहेत.

**इ) राजकीय संसूचनाची संकल्पना स्पष्ट करून संसूचनाची साधने सांगा.**
**प्रस्तावना -** राजकीय संसूचनाचा अर्थ व व्याख्या.
राजकीय संसूचनाची साधने - वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन, नाटके, चित्रपट, सभा-संमेलने, इ. **समारोप.**

**ई) राजकीय संस्कृतीची व्याख्या सांगा. राजकीय संस्कृतीचे घटक स्पष्ट करा.**
**प्रस्तावना** - राजकीय संस्कृतीचे महत्त्व थोडक्यात लिहावे.
राजकीय संस्कृतीची व्याख्या - ग्रॅबिएल आमंड, सिडने व्हर्बा यांनी केलेल्या व्याख्या लिहिणे.
राजकीय संस्कृतीचे घटक - १) सामाजिक परिस्थिती २) वांशिक भिन्नता ३) भाषिक भिन्नता ४) धार्मिक भिन्नत्व ५) शिक्षण व्यवस्था ६) इतिहास ७) भौगोलिक परिस्थिती ८) अर्थव्यवस्था ९) मानसिक घटक इत्यादी घटक थोडक्यात स्पष्ट करणे.
**समारोप** - वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**गृहपाठ ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) राजकीय पक्ष पद्धतीचे प्रकार**
**प्रस्तावना -** राजकीय पक्षाची व्याख्या, कार्ये स्पष्ट करणे.
राजकीय पक्ष पद्धतीचे प्रकार
१) द्विपक्ष पद्धती २) अनेकपक्ष पद्धती ३) एकपक्ष पद्धती
**समारोप** - राजकीय पक्ष पद्धतीचे गुण व दोष थोडक्यात लिहिणे.

**आ) दबावगट विषयक दृष्टिकोन**
**प्रस्तावना** - दबावगटाची व्याख्या, कार्ये याबाबत थोडक्यात लिहिणे.
दबावगट विषयक दृष्टिकोन -
१) लोकशाही व्यवस्थेतील दबावगट - यातील तंत्रे लिहिणे आवश्यक

२)	सर्वंकष व्यवस्थेतील दबावगट

३)	विकसनशील देशातील दबावगट

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

**इ)	राजकीय सामाजिकीकरणाची वैशिष्ट्ये**

**प्रस्तावना** – १) सतत घडणारी क्रिया २) विशिष्ट दृष्टिकोन ३) व्यक्त आणि अव्यक्त राजकीय सामाजिकीकरण ४) अनुभवजन्य राजकीय सामाजिकीकरण ५) प्रभावाची भिन्नता

**समारोप**.

**ई)	प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धती**

**प्रस्तावना** – प्रतिनिधी निवडण्याची सर्वात सोयीस्कर, सोपी व लोकप्रिय रूढ असलेली पद्धत म्हणजे प्रादेशिक प्रतिनिधित्वाची पद्धती होय.

प्रादेशिक प्रतिनिधित्व पद्धती –

१) गुण – १) प्रत्येक मतदार संघातून एक प्रतिनिधी कायदेमंडळावर पाठविण्यात येतात. २) सुटसुटीतपणा ३) मतदारांशी संपर्क व जवळीक

२) दोष – १) निवड करण्यास मर्यादित वाव २) तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन कायदा करताना मिळत नाही. ३) प्रादेशिक, जातीय व हितसंबंधी गटांना उत्तेजन मिळते ४) अल्पसंख्याकांचे शासन होण्याची शक्यता

**समारोप** – वरील माहितीच्या आधारे सारांश रूपाने समारोप लिहावा.

❁❁❁

# समग्रलक्षी अर्थशास्त्र (ES - 3)

**प्रश्न १) उपभोग प्रवृत्ती म्हणजे काय? उपभोग प्रवृत्तीत वाढ घडवून आणणारे घटक सांगा.**

उपभोग प्रवृत्तीची व्याख्या व तक्ता स्पष्ट करावा. (आकृतीची आवश्यकता नाही)

उपभोग प्रवृत्तीत वाढ घडवून आणणारे घटक – उत्पन्नाचे पुनर्वाटप, वेतन विषयक धोरण, सहज व स्वस्त दराने कर्ज मिळण्याची सोय, शहरीकरणातील वाढ, जाहिरात, वाहतूक साधनांचा–सोईचा विकास, सामाजिक सुरक्षा योजना, इ. मुद्यांचे विश्लेषण करावे.

**प्रश्न २) सार्वजनिक कर्ज म्हणजे काय? सार्वजनिक कर्जाचे प्रकार सांगून त्याचे परिणाम स्पष्ट करा.**

सार्वजनिक कर्ज – संकल्पनेचे स्पष्टीकरण, कर्जाचे दोन प्रकार – देशांतर्गत कर्ज व परकीय कर्ज – याबाबतचे स्पष्टीकरण, कर्जाचे परिणाम – उपभोगावरील परिणाम, वाढीव पतनिर्मिती, गुंतवणूकींवरील परिणाम, मागणीवरील परिणाम, कर्जाचा भार या दृष्टीकोनातून कर्जाचे परिणाम स्पष्ट करणे आवश्यक.

**प्रश्न ३) सुवर्ण चलन पद्धती म्हणजे काय? सुवर्ण चलन पद्धतीच्या ऱ्हासाची कारणे सांगा.**

सुवर्ण चलन पद्धतीची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. सुवर्ण परिमाणाच्या तीन प्रकारांचे थोडक्यात स्पष्टीकरण.

सुवर्ण चलन परिमाणाच्या ऱ्हासाची कारणे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करावीत. सोन्याचे विषम वाटप, सुवर्ण परिमाणाच्या नियमांचा भंग, आर्थिक राष्ट्रवादाचा उदय, आंतरराष्ट्रीय सहकार्याचा अभाव, युद्धोत्तरकालीन परिस्थिती, इंग्लंडनेच सुवर्ण परिमाणाचा त्याग केला, जागतिक महामंदी इ.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) उत्पन्नाचा वर्तुळाकार प्रवाह स्पष्ट करा.**

अर्थव्यवस्थेत होणाऱ्या आर्थिक व्यवहारामुळे उत्पन्नाचा, संपत्तीचा वर्तुळाकार प्रवाह निर्माण होतो – याबाबतचे विश्लेषण, अर्थव्यवस्थेत कुटुंबसंस्था आणि उद्योगसंस्था यांच्यामध्ये निर्माण होणारा उत्पन्नाचा वर्तुळाकार प्रवाह आकृतीसह स्पष्ट करणे आवश्यक.

**ब) वित्तीय धोरणाची उद्दिष्टे सांगा.**

वित्तीय धोरणाची व्याख्या व तिचे स्पष्टीकरण, उद्दिष्टे – बचत व गुंतवणुकीत वाढ, योग्य क्षेत्रात गुंतवणूक, आर्थिक विकासाला प्रेरक व पूरक भूमिका, सामाजिक व प्रादेशिक असमतोल दूर करणे, आर्थिक स्थिरता राखणे, भाववाढ टाळणे, लोककल्याण, रोजगार वृद्धी इ.

**क) प्रत्यक्ष कराचे फायदे सांगा.**

कराची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण. दोन प्रकार – प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष, प्रत्यक्ष कराचे फायदे – निश्चितता, न्याय्य तत्त्व, प्रगतिशीलता, रकमेची निश्चितता, लवचिकता, प्रत्यक्ष भार पडतो म्हणून लोकांमध्ये जागरूकता. या फायद्याचे विश्लेषण आवश्यक.

**ड) शासकीय खर्चातील वाढीची कारणे सांगा.**

शासकीय खर्चाचा अर्थ स्पष्ट करणे, कारणे स्पष्ट करताना लोकसंख्या वाढ, शहरीकरण, युद्धे, कल्याणकारी राज्याची संकल्पना, आर्थिक मंदी दूर करणे, लोकशाही संस्थांची स्थापना, किंमत पातळीतील वाढ इ. मुद्यांचा परामर्ष घ्यावा. या कारणांमुळे शासकीय खर्चात वाढ झाल्याचे लक्षात येते.

**प्रश्न ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) बचतीचे निर्धारक –**

अर्थव्यवस्थेमध्ये बचत कोणत्या घटकांवर अवलंबून असते त्याविषयीचे विश्लेषण, घटक – उत्पन्न, उत्पन्नाची विभागणी, व्याजदर, भविष्य काळातील अंदाज, राज्यवित्तीय धोरण, वित्तीय संस्थांचा विकास, लोकांच्या सवयी, राजकीय स्थैर्य इ. घटकांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**ब) वस्तू विनीमयातील अडचणी –**

वस्तू विनीमय म्हणजे काय याबाबतचे स्पष्टीकरण, अडचणी – वस्तुंचे परस्पर प्रमाण, गरजांचा दुहेरी संयोग आवश्यक, विलंबीत देणी देण्याची अडचण इ. मुद्यांचे विश्लेषण उदाहरणासह करावे.

**क) पैशाचा भ्रमणवेग –**

व्याख्या लिहून थोडक्यात स्पष्टीकरण, भ्रमणवेग पुढील गोष्टींवर अवलंबून असतो – रोखतेची अभिलाषा, आर्थिक उलाढाल, उत्पन्नातील अनियमीतपणा, उत्पन्नाचे विभाजन, आर्थिक व्यवहाराच्या पद्धती, उत्पादन संस्था व महामंडळे यांच्याकडील रोख रक्कम, पैशाच्या वहनाचा वेग, इ. मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**ड) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे –**

आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय थोडक्यात स्पष्टीकरण, फायदे – सर्वांसाठी सर्व वस्तूंची उपलब्धता, उद्योगांसाठी आवश्यक मूलभूत गोष्टी, वाढत्या मागणीची पूर्तता, अवजड उत्पादने सर्वच देशांना शक्य नसते, टंचाई – दुष्काळ – भूकंप अशा नैसर्गिक आपत्ती काळात मदत, नवी यंत्रे – नवे तंत्र यांची आयात इ. फायद्यांचे विश्लेषण करणे आवश्यक.

# आर्थिक विचारांचा इतिहास (ES - 4)

**प्रश्न १) व्यापारवादाच्या उदयाची कारणे सांगा.**

व्यापारवादाची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण, व्यापारवादाच्या उदयाच्या आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शास्त्रीय, तांत्रिक या सर्व कारणांचे स्पष्टीकरण. ही कारणे स्पष्ट करताना त्यामधुन व्यापाराचे महत्व कसे वाढले, यावर भाष्य आवश्यक.

**प्रश्न २) माल्थसच्या लोकसंख्याविषयक सिद्धान्ताचे टिकात्मक परीक्षण करा.**

माल्थसने मांडलेला एक महत्वाचा सिद्धान्त, सिद्धान्ताची रूपरेषा स्पष्ट करणे, लोकसंख्या वाढीवरील प्रतिबंधक उपायांचे स्पष्टीकरण आवश्यक, माल्थसचा निराशावाद, सिद्धान्ताचे टिकात्मक परिक्षण करताना या सिद्धान्तातील दोष दाखविणारे मुद्दे स्पष्ट करावेत.

**प्रश्न ३) दादाभाई नौरोजींचा आर्थिक निस्सारणाचा सिद्धान्त स्पष्ट करा.**

सिद्धान्त मांडताना निस्सारण संकल्पना, ब्रिटिशांनी भारताची आर्थिक पिळवणूक केली त्यासंबंधीचे विचार त्यांनी मांडले, त्याबाबत स्पष्टीकरण, निस्सारणाचे स्वरूप स्पष्ट करताना भारताचे शोषण करण्यासाठी ब्रिटिशांनी पुढील मार्ग वापरले त्याबाबतचे स्पष्टीकरण. गृहखर्च, युद्धखर्च, निर्यात, कर्ज व त्यावरील व्याज, विक्रीवरील नफा, अधिकाऱ्यांनी पाठविलेली संपत्ती, सेवा खर्च इ.

आर्थिक निस्सारणाचे परिणाम स्पष्ट करताना पुढील मुद्दे स्पष्ट करावेत. भारताच्या दारिद्र्यात वाढ, शेतीप्रधान अर्थव्यवस्था, उद्योगधंदे नष्ट झाले, विविध क्षेत्रावर विपरीत परिणाम, विकास प्रक्रिया ठप्प झाली, इतर परिणाम इ.

**प्रश्न ४) पुढील प्रश्नांची २५ ते ३० ओळीत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

**अ) निसर्गवादाच्या उदयाची कारणे सांगा.**

निसर्गवादाची व्याख्या - संकल्पनेचे स्पष्टीकरण, कारणे - फ्रान्समधील तत्कालीन परिस्थिती, शेतीकडे दुर्लक्ष, इंग्लंडमधील नवविचारांचा प्रभाव, इ. मुद्यांचे स्पष्टीकरण आवश्यक.

**ब) स्मिथचे श्रमविभागणी विषयक विचार सांगा.**

श्रमविभागणी - स्मिथच्या विवेचनात महत्त्व, संपत्तीच्या वृद्धीसाठी श्रमविभागणीच्या तत्त्वावर अर्थव्यवस्थेची उभारणी झाली पाहिजे हा विचार स्मिथने मांडला, वेळेची बचत, उत्पादनात वाढ, कामगाराचे कौशल्य वाढते, इ. फायदे, टाचणी उत्पादनाचे उदाहरण देणे आवश्यक.

**क) रिकार्डोचे मूल्य विषयक विचार सांगा.**

रिकार्डोच्या मते मानवी श्रमानुसार वस्तुचे मूल्य ठरते, वस्तुला उपयोगिता व विनीमय मूल्य असते. या दोन्ही मूल्याबाबतचे उदाहरण पाणी व सोने या वस्तुंच्या संदर्भात स्पष्ट करणे आवश्यक, दुर्मिळता म्हणून किंमत प्राप्त होते.

**ड) अल्पाधिकार बाजारपेठेची वैशिष्ट्ये सांगा.**

अल्पाधिकार बाजारपेठेची व्याख्या व स्पष्टीकरण, वैशिष्टे - परस्परावलंबित्व, अनिश्चित स्वरूपाचा मागणी वक्र, उद्योगसंस्थांची परस्परविरोधी प्रवृत्ती, मक्तेदारीचा अंश, किंमतीची ताठरता, या मुद्यांच्या आधारे स्पष्टीकरण आवश्यक.

प्रश्न ५) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)

**अ) निव्वळ उत्पन्न –**

निसर्गवादातील महत्वाची संकल्पना, फक्त निसर्गातच अधिक्य, वाढावा निर्माण होतो – म्हणून निसर्ग श्रेष्ठ, औद्योगिक क्षेत्रात फक्त कच्च्यामालाचे रूपांतर पक्क्या मालामध्ये होत असते. व्यापारातूनही नवीन असे काहीच निर्माण होत नाही म्हणून फक्त निसर्गातच निव्वळ उत्पादन होते याबाबतचे विश्लेषण.

**ब) तौलनिक उत्पादन खर्चाचा सिद्धान्त –**

रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचा सिद्धान्त, सिद्धान्त व त्याचे उदाहरणासह स्पष्टीकरण आवश्यक, तुलनात्मक जास्त उत्पादन व त्यामधुन दोन्ही देशांचा लाभ कसा होतो, याबाबतचे विश्लेषण.

**क) समाजवादाची कार्य पद्धती –**

समाजवादाची व्याख्या व थोडक्यात स्पष्टीकरण, कार्यपद्धती स्पष्ट करताना पुढील मुद्यांचे विश्लेषण आवश्यक, सत्तेचे केंद्रीकरण एकाच पक्षाकडे, उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी, केंद्रीय नियोजन, किंमत यंत्रणेला महत्व नसते, सामाजिक न्यायाच्या तत्त्वानुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन.

**ड) विक्री खर्च –**

व्याख्या – संकल्पनेचे स्पष्टीकरण, विक्री खर्च व उत्पादन खर्चातील फरक, खर्च केव्हा करावा लागतो व त्याचे परिणाम काय होतात याबाबत थोडक्यात स्पष्टीकरण.

❁❁❁

# आधुनिक महाराष्ट्र (इ.स. १८१८ ते १९६०) - (HS - 3)

**प्र. १ - लो. टिळकांच्या राजकीय कार्याचा थोडक्यात आढावा घ्या.**

**प्रस्तावना** - लो. टिळकांचा अल्प परिचय.

लो. टिळकांचे राजकीय कार्य - ध्येय - स्वराज्य, साधने - चतु:सूत्री - लोकजागृती, चळवळ (प्रत्यक्ष कृती), ऐक्य, लोकजागृती - राष्ट्रीय शिक्षणासाठी संस्थास्थापना, केसरी-मराठा वृत्तपत्रे, चळवळी - स्वदेशीची (वंगभंगविरोधी) चळवळ, होमरूल लीगची चळवळ, ऐक्याचे प्रयत्न - लखनौ अधिवेशन - मवाळांशी समन्वय, मुस्लीम लीगशी ऐक्याचा करार. **समारोप**- लो. टिळकांच्या राजकीय कार्याचे मूल्यमापन.

**प्र. २ - संयुक्त महाराष्ट्रच्या स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचालीचा आढावा घ्या.**

**प्रस्तावना** - स्वातंत्र्यपूर्व काळातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीची वाटचाल.

संयुक्त महाराष्ट्रच्या स्वातंत्र्योत्तर काळातील वाटचाल - दार कमिशन, जे.व्ही.पी. कमिटी, फाजलअली आयोग, चळवळ - फाजलअली आयोगाच्या विरोधात चळवळ , मंत्रिपदाचे राजिनामे, विविध नेत्यांचे व साहित्यिकांचे योगदान, मुंबईतील अत्याचार, संयुक्त महाराष्ट्र समितीचे निवडणुकांतील यश, काँग्रेसचा पाठिंबा.

**समारोप** - संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती.

**प्र. ३ महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीची माहिती सांगून तिचे मूल्यमापन करा.**

**प्रस्तावना -** या चळवळीचे ढोबळ स्वरूप.

ब्राह्मणेतर चळवळ -

म. फुले, छ. शाहूमहाराजांचे कार्य - वेदोक्त प्रकरण, क्षात्र जगदगुरू पदाची निर्मिती, स्वतंत्र प्रवाह, ब्राह्मणांबाबत अनुदार धोरण व ब्राह्मणांवरील अत्याचार, दलितांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष, सुरुवातीच्या नेत्याची राजकीय अनास्था, विठ्ठल रामजी शिंदेंची राजकीय भूमिका, मराठा राष्ट्रीय संघाची स्थापना, चेम्सफोर्ड सुधारणा व मराठ्यांना स्वतंत्र मतदार संघ, जेधे-जवळकरांचे नेतृत्व व राजकीय भूमिका, लो. टिळक व ब्राह्मणेतर चळवळ, संघर्ष, ब्राह्मणेतरांमधील अंतर्गत संघर्ष, म. गांधी व केशवराव जेधेंची ब्राह्मणेतर चळवळीवरील टिका.

**समारोप -** ब्राम्हणेतर चळवळीच्या मर्यादांमुळे स्वतंत्र दलित चळवळीची उभारणी.

**प्र. ४ - खालील प्रश्नांची २५ ते ३० वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)**

**अ) भक्ती चळवळीचे सामाजिक योगदान लिहा.**

**प्रस्तावना** - भक्ती चळवळ म्हणजे काय?

भक्ती चळवळीचे सामाजिक योगदान : विविध जातीतील संत, विठ्ठलाची सगुण भक्ती, पंढरीची वारी, कर्मकांडांना व जातिभेदाा विरोध, आध्यात्मिक क्षेत्रातील समानता, मध्यस्थीला विरोध, द्वैतवाद, लोकभाषा मराठीचा अवलंब, एकत्व व समानतेची भावना रुजली, रामदासस्वामींचे वेगळेपण : श्कतीची उपासना, ऐक्य व क्षात्रतेजाला चालना, महाराष्ट्रधर्माचा पुरस्कार.

**समारोप** - आधुनिक काळात सुधारकांनी याच भक्तिमार्गाचा पुरस्कार केला.

**ब) साताऱ्याच्या पत्रीसरकारची माहिती द्या.**

**प्रस्तावना**- १९४२ ची चळवळ, साताऱ्याचे पत्री सरकार - क्रांतिसिंह नाना पाटील, मार्ग - पर्यायी सरकारची स्थापना, शस्त्रास्त्रे, खजिना, तुफानी सेना, कार्य - शेतकऱ्यांना न्याय, सामाजिक सुधारणा, इंग्रज सरकारविरुध्द मोहीम.

**समारोप** - या चळवळीने स्वातंत्र्य तर जवळ आणलेच पण लोकांना राज्यकारभाराचे प्रशिक्षण व अनुभवही त्यातून मिळाला.

**क) कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणविषयक कार्य लिहा.**

**प्रस्तावना** - पाश्चात्य शिक्षणातील दोष - राज्यकर्त्यांच्या गरजेला प्राधान्य, शहरी जनतेस मध्यवर्ती ठेवून विचार, या दोषांतून शिक्षणक्षेत्रात अनेक प्रयोग. त्यातील महत्त्वाचा प्रयोग म्हणजे कर्मवीरांची रयत शिक्षण संस्था

शिक्षणविषयक कार्य - दुधगाव विद्यार्थी आश्रम, रयत शिक्षण संस्थेची स्थापना, उद्दिष्टे, विविध शैक्षणिक संस्थांची योजना, मुष्टीफंड योजना, छत्रपती शाहू बोर्डींग हाऊस, कमवा आणि शिका योजना इ.

**समारोप** - शिक्षणाच्या प्रसारात आणि रयतेला स्वावलंबी बनविण्यात महत्त्वाचा वाटा.

**ड) सामाजिक परिवर्तन व साहित्य यांतील अन्योन्य संबंध सांगा.**

**प्रस्तावना** - आधुनिक काळात मराठी साहित्यात लक्षणीय भर (उदाहरणे देणे). ही भर भारतातील प्रवोधनामुळे. कारण सामाजिक परिवर्तन व साहित्य यांतील अन्योन्य संबंध असतो.

सामाजिक परिवर्तन व साहित्य यांतील अन्योन्य संबंध : साहित्याचा विषय काही वेळा थेट आजूबाजूच्या पर्यावरणातून, लेखक समाजाचा अविभाज्य भाग त्यामुळे समाजाचे साहित्यात प्रतिबिंब लेखक समाजाचे प्रतिनिधीत्व करतो, साहित्य समाजपरिवर्तनाला हातभार लावते.

**समारोप** - हा संबंध स्पष्ट करणारी दोन चार उदाहरणे.

**प्र. ५ - खालील टिपा २५ ते ३० वाक्यात लिहा. (कोणत्याही दोन)**

**अ) स्वा. सावरकरांचे क्रांतिकार्य**

**प्रस्तावना** - सशस्त्र क्रांतिकारी चळवळ म्हणजे काय?

स्वा. सावरकरांचे क्रांतिकार्य - लेखन, अभिनव भारतची स्थापना व कार्य, जन्मठेपेची शिक्षा.

**समारोप** - स्वा.सावरकरांचे सामाजिक योगदान.

**ब) प्रार्थना समाज**

**प्रस्तावना** - पूर्वपीठिका - परमहंस मंडळी.

प्रार्थना समाज - स्थापना, मूल्ये व विचारधारा, कार्य - धार्मिक व सामाजिक.

**समारोप** - प्रार्थना समाजाला फारसे यश का लाभले नाही?

**क) म. जोतिबा फुले**

**प्रस्तावना** - म. फुल्यांचा अल्प परिचय.

म. फुले यांचे कार्य - स्त्रियांसाठी कार्य - शाळा, विधवाविवाहास पाठिंबा, बालहत्याप्रतिबंधक गृहाची स्थापना, केशवपनाविरुध्द न्हाव्यांचा संप, दलितांसाठी कार्य - शाळा, समानतेचा पुरस्कार, शोषणाविरुध्द आवाज, सत्यशोधक समाजाची स्थापना, सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना - मानवतावाद, विश्वबंधुत्व, कृतिशीलता इ. वर भर, भक्तिमार्गाशी जवळीक, **समारोप** - म. फुल्यांच्या कार्याचे मूल्यमापन.

**ड) राष्ट्रीय शिक्षण**

**प्रस्तावना -** पाश्चात्त्य शिक्षणाचे स्वरूप व दोष.

राष्ट्रीय शिक्षण ; कारणे : सरकारी शिक्षणाची हवी तशी प्रगती नाही, प्रेरणा जनजागृती व देशसेवा, स्वार्थत्यागाची शिक्षकांकडून अपेक्षा, अभ्यासक्रमामध्ये सामान्य ज्ञान व नैतिक शिक्षणाचा अंतर्भाव, चित्रकला, समगीत व शारीरिक शिक्षणाचा, यंत्रशास्त्र व रसायनशास्त्राचा समावेश, सरकारी शाळांपेक्षा वेगळी पाठ्यपुस्तके, संस्थांची उदाहरणे अपेक्षित.

**समारोप** - राष्ट्रीय शिक्षणाचे महत्त्व.

# चीन अणि जपानचा इतिहास (इ.स. १८३९ ते १९६०)- (HS - 4)

**प्रश्न १) – तायपिंग बंड का व कसे उद्भवले? तायपिंगांनी कोणत्या सुधारणा राबविल्या ?**

**प्रस्तावना** – इ.स. १८५० ते १८६४ या काळात चीनमध्ये मांचू राजवटीविरुध्द हंग सिऊ-चुआन याच्या नेतृत्वाखाली तायपिंग बंड उद्भवले.

तायपिंग बंडाची कारणे – अकार्यक्षम सम्राट, भ्रष्ट अधिकारी, नैसर्गिक आपत्ती, लोकसंख्यावाढ व शेतजमिनींची कमतरता, शेतकऱ्याची दुर्दशा, शेतजमिनींची विक्री व शेतकऱ्यांची भूमिहीनता व लुटारू वृत्ती. मांचू सत्तेबाबत अविश्वास. हंग सिऊ-चुआनचे नेतृत्व, क्वांगतुंग प्रांतातील दुष्काळ व बंडाची सुरुवात. तायपिंग तिएन कुओची स्थापना. तायपिंगांच्या सुधारणा – साम्यवादी धर्तीवर जमीन व संपत्तीचे पुनर्वाटप, स्त्रिविषयक सुधारणा.

**समारोप** – तायपिंग बंड मांचू सत्तेने पाश्चात्यांच्या मदतीने चिरडले. तायपिंग बंडाचे महत्त्व.

**प्रश्न २) चीनमधील १९११ च्या क्रांतीची कारणे लिहा.**

**प्रस्तावना –** १९११ च्या क्रांतीचे स्वरूप.

१९११ च्या क्रांतीची कारणे –

दुबळी मांचू राजसत्ता, अन्यायी करवाढ व आर्थिक दूरवस्था, भ्रष्ट प्रशासन, पाश्चात्य विचारांचा प्रभाव, विविध उठाव, डॉ. सन यत-सेन यांचे नेतृत्व, युआन शि काईचे कार्य.

**समारोप –** मूल्यमापन.

**प्रश्न ३) – जपानच्या पुनर्घटनावर टीपण लिहा.**

**प्रस्तावना** – लष्करवादाच्या प्रभावातून जपानने इ.स. १९३१ पासून फार मोठा साम्राज्यविस्तार केला. दुसऱ्या महायुध्दाच्या अखेरीस अमेरिकेने जपानच्या दोन शहरांवर अणूबॉम्ब टाकले. परिणामी जपानला शरणागती पत्करावी लागली. यानंतर जपान अमेरिकेच्या ताब्यात गेला. सेनानी मॅक आर्थर याच्या नेतृत्वाखाली जपानचे पुनर्घटन करण्यात आले. जपानच्या पुनर्घटनामागील हेतू – जपानमधील लष्करवादाचे व वृत्तीचे समूळ उच्चाटन करणे आणि रशियन नेतृत्वाखालील साम्यवादी प्रभावापासून जपानला दूर ठेवणे. पुनर्घटनासाठी राबविण्यात आलेल्या सुधारणा व धोरणे – जपानचे निर्लष्करीकरण, युध्दॉ गुन्हेगारांची चौकशी, लोकशाहीच्या विकासासाठी प्रयत्न, आर्थिक सुधारणा, औद्योगिक सुधारणा, शेती क्षेत्रातील सुधारणा, शैक्षणिक सुधारणा, सामाजिक सुधारणा.

**समारोप** – या सुधारणाच्या यशाच्या खात्रीनंतर जपानशी अमेरिकेचा शांतता करार. पुनर्घटनाच्या काळातील सुधारणामध्ये व जपानी समाजाच्या चिकाटी वृत्तीमध्ये जपानच्या आजच्या प्रगतीची बिजे.

**प्रश्न ४) – पुढीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० ओळीत लिहा.**

**अ) बॉक्सर उठावाची कारणे लिहा.**

**प्रस्तावना** – इ.स. १८९९-१९०० मध्ये चीनमध्ये मुष्टियोध्यांच्या इ-हो चुआन या संघटनेने मांचू राजवट व पाश्चात्यांविरुध्द उठाव केला.

बॉक्सर उठावाची कारणे – मांचू राजवटीविरुध्द असंतोष, आर्थिक शोषण व ख्रिश्चन धर्माचा प्रसार यामुळे पाश्चात्यांविरुध्द असंतोष, नैसर्गिक आपत्ती, इ-हो चुआनची लोकप्रियता इ.

**समारोप** – हा उठाव मांचू सत्तेने पाश्चात्यांच्या मदतीने दडपला. उठावानंतर पाश्चात्यांनी चिनी सरकारवर खंडणी लादली. या अपयशातून मांचू राजवट नष्ट करण्याची निकड तीव्रतेने वाटू लागली.

ब) **माओकालीन सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक सुधारणांची माहिती द्या.**

**प्रस्तावना** – इ.स. १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती होऊन माओ त्से तुंग च्या हाती सत्ता गेली. त्यानंतर सुधारणांना सुरुवात.
सामाजिक सुधारणा – सामाजिक समतेसाठी प्रयत्न, अनिष्ट प्रथांचे उच्चाटन.
शैक्षणिक सुधारणा – प्रथम लवचिक धोरण, शिक्षण सास्यवादाला पोषक बनविण्याचे प्रयत्न, मोफत, विज्ञाननिष्ठ व साम्यवादी शिक्षण, स्वतंत्र विचारांची गळचेपी.
धार्मिक सुधारणा – धर्म ही अफूची गोळी हा विश्वास, राष्ट्रीय समाज निर्माण करण्याचा प्रयत्न, प्रथम धार्मिक स्वातंत्र्य, नंतर मात्र सार्वजनिक जीवनातील धर्माचे महत्त्व कमी करण्याचे पध्दतशीर प्रयत्न.
**समारोप** – साम्यवादाला पोषक सुधारणांचा अवलंब.

क) **मध्ययुगीन जपानची अलिप्तता आधुनिक काळात का व कशी संपुष्टात आली ?**

**प्रस्तावना** – १६ व्या शतकात ख्रिश्चन धर्माचे जपानमध्ये आगमन, परंतु संस्कृतीच्या अभिमानामुळे १७ व्या शतकात ख्रिश्चन धर्म व डच सोडता पाश्चात्त्य लोक सर्वावरच बंदी आणि जपान जगापासून अलिप्त.
अलिप्तता का व कशी संपुष्टात – जपानशी व्यापाराची गरज, चीनबरोबरील व्यापारासाठी सागरी प्रवासात थांब्याची व इंधनाची गरज, खलाशांना मदतीची गरज या अनेकविध गरजांमुळे अमेरिकतर्फे जपानला कमोडोर पेरी याची युध्दनौकांसह भेट, तोकुगावाकालीन शांतता, व्यापार व व्यापारी यांचे महत्त्व यामुळे जपान खुला व्हावा ही जपानमधील काही गटांची इच्छा या सर्व कारणांमुळे जपान परकियांना खुला.
**समारोप** – जपान परकियांना खुला झाल्याने जपानमध्ये परिवर्तनाची व आधुनिकतेची सुरुवात.

ड) **जपानमधील पक्षीय शासनाच्या अपयशाची कारणे लिहा.**

**प्रस्तावना** – जपानमध्ये सुरुवातीपासून लष्कर व लष्करी पेशा यांना महत्त्व, पहिल्या महायुध्दानंतर राजकीय पक्षांच्या हाती सत्ता. १९१८ ते १९३२ या चौदा वर्षांच्या काळात ११ मंत्रिमंडळे सत्तेवर आली आणि गेली.
पक्षीय शासनाच्या अपयशाची कारणे – संपूर्ण संसदीय पध्दतीचा अभाव, राजकीय पक्षांचा दुबळेपणा, जपानी समाजव्यवस्था, प्रशासनाचे वर्चस्व, लष्कराचे प्रभूत्व, झैबत्सू, जपानची आर्थिक स्थिती.
**समारोप** – या टप्प्यानंतर पुन्हा एकदा जपानमध्ये लष्कराचे वर्चस्व.

**प्रश्न ५) – कोणत्याही दोन टिपा प्रत्येकी २५ ते ३० ओळीत लिहा.**

अ) **पहिले अफू युध्द व नानकिंगचा तह**

**प्रस्तावना** – इ.स. १८३९ मध्ये चीन व चीनमधील ब्रिटिश व्यापारी यांच्यात युध्द.
कारणे – पाश्चात्त्यांना येणा-या व्यापारातील अडचणी, चीनकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक , अफूच्या व्यापारातील इंग्लंडला होणारा फायदा व चीनकडून त्या व्यापारावर आलेली बंदी, ब्रिटिशांविरुध्द लिन-त्सेने केलेली कारवाई, चिनी खेडुताचा मृत्यु, युध्द – २ वर्षे चालून अखेर चीनचा पराभव, नानकिंगचा तह – कलमे – खंडणी, पाच बंदरे व्यापारासाठी खुली, आयात-निर्यातीवरील कर, न्याय्य असावेत, को हाँगची मक्तेदारी नष्ट, हाँगकाँग बेट इंग्लंडला, सर्व देशांना समान वागणूक, बेकायदेशीर व्यापारास प्रतिबंध करण्यास इंग्लंडचे सहकार्य.
**समारोप** – युध्दाचे परिणाम – चीनचा दुबळेपणा सिध्द, चीनच्या आधुनिकीकरणाची सुरुवात.

## ब) क्योमिंतांग पक्षाचा उदय व विकास

**प्रस्तावना** – इ.स. १९२८ मध्ये चीनमध्ये क्योमिंतांग पक्षाचे लोकशाही सरकार स्थापन झाले. चीनची सूत्रे इ.स. १९४९ पर्यंत क्योमिंतांग पक्षाच्या हातात होती.

पक्षाची स्थापना – इ.स.–१९१२. १९११ च्या क्रांतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या तुंग मेंग हुई या गुप्त संघटनेचे रुपांतर या पक्षात झाले.

उदय व विकास – इ.स. १९१३ मध्ये युआन शि–काईकडून क्योमिंतांगवर बंदी व पुढे लोकशाहीही बरखास्त. इ.स. १९१७ मध्ये कँटन येथे क्योमिंतांगच्या प्रतिसरकारची स्थापना. डॉ. सन यत् सेन हा पक्षाचा आजीव अध्यक्ष. रशियाच्या मदतीतून लष्कर उभारणी. सन यत् सेनच्या तीन तत्त्वांना प्राधान्य, लोकशाही विकेंद्रीकरणाचा स्वीकार. कम्युनिस्ट पध्दतीची यंत्रणा व तंत्र परंतु, तत्त्व मात्र लोकशाहीचे.

**समारोप** – डॉ. सन यत् सेनच्या मृत्यूनंतर क्योमिंतांग पक्षात अंतर्गत संघर्ष. इ.स. १९२८ मध्ये चिआंग कै–शेकच्या हाती पक्षाची सूत्रे.

## क) मेईजी काळातील राजकीय सुधारणा

**प्रस्तावना** – जपान परकियांना खुला झाल्यावर इ.स. १८६८ मध्ये मुत्सुहितो याच्या हाती जपानची सत्तासूत्रे. या सम्राटाच्या कारकिर्दीमध्ये विविध क्षेत्रांमध्ये सुधारणांचा अंगिकार.

मेईजी काळातील राजकीय सुधारणा – शोगुन पद रद्द, सरंजामशाहीचा अंत, इ.स.१८८६ मध्ये जर्मनीच्या धर्तीवर नव्या राज्यघटनेची निर्मिती. या घटनेनुसार सम्राटाला महत्त्व व त्याचे पद दैवी मानले गेले. द्विगृही राष्ट्रीय विधीमंडळाची निर्मिती, वरीष्ठ सभागृह हे उमरावांचे, कनिष्ठ सभागृह लोकप्रतिनिधींचे, या गृहांचा एकमेकास शह, सम्राटाला नकाराधिकार, मंत्रिमंडळ लोकांना नव्हे तर सम्राटाला जवाबदार, मंत्रिमंडळाचे लष्करावर नियंत्रण नव्हते.

**समारोप** – मेईजी काळात नव्या राज्यघटनेनुसार लोकशाहीची निर्मिती पण खूप मर्यादा, सकृतदर्शनी सम्राटाची सत्ता सर्वोच्च पण प्रत्यक्षात सत्तासूत्रे जेन्रो या दाईम्यो व सामुराईंच्या महाजन सत्तेकडे.

## ड) इंग्लंड – जपान करार

**प्रस्तावना** – इ.स. १९०२ मध्ये इंग्लंड व जपान यांच्यात मैत्री करार.

पार्श्वभूमी – आंतरराष्ट्रीय राजकारणातील इंग्लंडचे एकाकीपण व रशिया हा समान शत्रू. चीन–जपान युध्दातील जपानच्या विजयाने जपानच्या सामर्थ्याचा प्रत्यय.

इंग्लंड–जपान करार – परस्परांच्या प्रभावक्षेत्रांना मान्यता, चीन व कोरियाच्या प्रादेशिक अखंडत्वास मान्यता, एका राष्ट्राने आक्रमण केल्यास युध्दात तटस्थता, एकापेक्षा जास्त देशांनी आक्रमण केल्यास एकमेकांस मदत.

**समारोप** – या कराराने जपानची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा अधिकच वाढली.

❁❁❁

# Tally (Theory)

**(40mks)**

**Q1 Answer the following** **(20mks)**

1. Explain the roll of Accountant in detail.
2. Write a note on Trial balance.
3. What are the elements of cost?
4. What are the factors which may affect product mix?

**Q 2 Answer the following in detail.** **(20mks)**

1. What is cost accounting and what is the difference between cost accounting and management accounting?
2. Describe in detail about Bank Reconciliation.